
# प्रबोधन


वर्ष ४ अंक ७
सौर माघ शके १९१७






**ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक !**

## चित्र काढून रंगवा




पिंकी, मी इथं आहे ते आईला सांगू नको.
बंटी ऽ ऐ बंटी
पिंकू, बंटी आहे का घरांत?
तू इथं नाहीस तर कुठं आहेस म्हणून सांगू आईला.

ॐ

छात्र प्रबोधन

वर्ष ४ अंक ७

सौर माघ शके १९१७

विनोद विशेषांक



इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात.

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेंद्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
भास्कर सगर, पुणे.

**अक्षर जुळवणी**
अक्षय एंटरप्राईजेस ॲण्ड सर्व्हिसेस
५१६ ब, नारायण पेठ, पुणे–३०

**संपर्क**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ
पुणे ४११०३०
☎ ४७७६९१

**मुद्रक**
प्रबोध संपदा, पुणे – २.

**वार्षिक वर्गणी**
रु. ७५/–

**या अंकाची किंमत**
रु.६/–

**नोंदणी क्रमांक**
PHM/153/VIII

## या अंकात दडलंय काय?


* संवाद २
* साहित्यातील विनोद ३
* कथा – मला कंचेंडू पाह्यजेय। ७
* परीक्षेचा आदला दिवस ९
* असे हे गणिती ... गणितज्ञांच्या गमती १३
* कविता पानोपानी १६
* हजरजबाबीपणा आणि विनोद ! १७
* ।।हास्यमाहात्म्य।। २१
* असे हे वैज्ञानिक २३
* संस्कृत – विनोदी सुभाषिते २७
* विनोदातील आमची प्रतिभा २९
* विडंबन – आम्ही कोण? ३२
* वाचलेच पाहिजे – सुदाम्याचे पोहे ३३
* मुलाखत – मधुकर टिल्लू ३५
* हसण्याआधी क्षणभर ३७
* आजच्या शिळ्या बातम्या ४०
* साहित्यप्रेमी कवयित्री – शांता ज. शेळके ४१
* आकड्यांशी मस्ती ४६
* स्थानिक कार्यालये... ४८

# संवाद





*प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,*

*'छात्र प्रबोधन' चा विनोद विशेषांक तुमच्या हातात देताना थोडा अधिकच आनंद होतोय ! कारण...सुटलो बुवा एकदाचा ! अंकासाठी येणारे विविध प्रकारचे लेख अन् अंकांची प्रुफे वाचून हसता हसता अन् हसू न येणाऱ्या ठिकाणी (ओ) रडता रडता अगदी पुरेवाट लागली म्हणून ! (हे अगदी गंमतीनं हं) गेले ६-८ महिने हा अंक तुमच्यापर्यंत पोहोचविण्याचा आम्ही चंगच बांधला होता. पण प्रत्येक वेळी 'माशी' शिंकायची ! ही अंधश्रद्धा नव्हे बरं का !* ***मान्यवरांचा शीत*** *(थंड) प्रतिसाद आमच्या उत्साहाला आवर घालायचा. या थंडीमुळे कधी नव्हे ते आम्ही शिंकू लागलो. नाक गळू लागले. ते पुसता पुसता नाकी नऊ आले.*

*अशी कसरत करत करत अखेर हा अंक सजला अन् छापून तो तुमच्यापर्यंत पोहोचविण्यास आम्हीही धजलो.* ***विविध क्षेत्रातील विनोदांचे विविधांगी प्रकार तुमच्यापर्यंत पोहोचविण्याच्या ह्या प्रयत्नाला तुम्ही केवळ हसण्यावारी नेऊ नका पण हसून अथवा हसण्याचा प्रयत्न करून आवर्जून दाद द्या.*** *तुमचे हसणे कसेही चालेल... सातमजली गडगडाटापासून स्मित हास्य अन् एवढेच नव्हे तर मूक हसण्यापर्यंतसुद्धा, मुळूमुळू हसण्यापासून हमसून हमसून हसण्यापर्यंत; न आवरता येणारे हसण्याचे उमाळे देत राहण्यापासून हसून क्षणात गंभीर चेहरा करण्यापर्यंत (जणू हसण्यामुळे झालेला गुन्हा ! कोणाला कळूच नये म्हणून) भूतकाळात (अथवा भविष्यकाळातील!) कोणत्याही घटनांबाबत (त्या जेव्हा केव्हा कळतील-आठवतील तेव्हा) आठवून हसण्यापासून ते वर्तमानातील न कळलेल्या विनोदालाही हसून दाद देण्यापर्यंत कसेही हसले तरी चालेल, पण हसा ! कारण हा 'विनोद' विशेषांक आहे.*

*तर असा हा अंक तुम्ही नक्की वाचाल अशी खात्री आहे.* ***तुम्ही सर्वांनी मनसोक्त निखळ, मोकळेपणानं हसावं, हसत राहावं अन् अनेकांना हसवावं, हसत ठेवावं ही या विनोद विशेषांकाच्या निमित्ताने अपेक्षा !*** *(पण आपलं हसं होणार नाही याचीही काळजी घ्यावी बरं !)*

*फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने या संमेलनाच्या अध्यक्षा शांताबाई शेळके यांच्यावरील विशेष लेख या अंकात घेतला आहे. मार्च ९६ चा अंक 'ग्रामीण विशेषांक' असणार आहे. त्यानिमित्ताने आपल्या सूचना, लेख २० फेब्रुवारी पर्यंत जरूर पाठवा. सुट्टीतील शिबिरांबाबत सविस्तरपणे या अंकात वाचालच. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावं ही अपेक्षा !*

*विनोद विशेषांकाच्या निमित्ताने तुम्हाला काही विनोद, विनोदी कथा-प्रसंग, काव्य सुचले तर आवर्जून पाठवा. पुढील मासिकांमध्ये त्याचा समावेश करायला आम्हाला निश्चितच आवडेल.*

***मनसोक्त हसण्यासाठी सर्वांना शुभेच्छा !***

सस्नेह तुमचा

**(महेन्द्र सेठिया)**

# साहित्यातील विनोद

**प्रा. चारुता पुराणिक**

एक स्त्री एका झाडाखाली बसून लाडू विकायची. विकताना ती म्हणत असे, ''लाडू घ्या लाडू, ताजे, गोड, मथुरेचे लाडू !'' रोज तिचे हे लाडू विकणे पाहून एक चौकस माणूस तिला विचारतो, ''काय हो बाई, रोज तर तुम्ही इथेच बसलेल्या असता अन् मथुरेहून कधी लाडू आणता?'' ती लाडूवाली उत्तर देते, ''अरे बाबा, मी रोज स्वत: लाडू करून विकते. माझे नाव मथुरा ! म्हणून म्हणते, मथुरेचे लाडू !! मथुरा गावचे नव्हे !'' हा छोटासा गंमतीशीर किस्सा !

गप्पांतून अनेकदा विनोद, गंमती, शाब्दिक कोटया, पी. जे. सांगून मित्रमैत्रिणींना आपण खुलवतो. स्वत:चा व दुसऱ्यांचा आनंद अशा हास्यकथा, किस्से सांगून वाढत असतो. वृत्तपत्रे, मासिके तसेच विनोदी साहित्यातून आपल्याला भेटणाऱ्या विनोदात रमणे अन् हसणे अनेकांना आवडत असले तरी, विनोद सांगणे, शाब्दिक कोट्या करणे प्रत्येकालाच जमत नाही ! एखादीच व्यक्ती अशी असते की तिला अवती-भवती घडणाऱ्या घटनांतील काही वेगळेपण लक्षात येते, प्रसंगातील विसंगती जाणवते आणि मग या वेगळेपणाची मांडणी इतरांपुढे अशा पद्धतीने केली जाते की, वाचणाऱ्याला ऐकणाऱ्यांना हमखास हसू येते. विनोदबुद्धी दृष्टी दुर्मीळ तर खरीच पण तिची जादू जबरदस्त असते. अमृताशी पैजा जिंकणाऱ्या मराठी भाषेला एक असा लवचीकपणा आहे की,




ही आपली मराठी भाषा ऐकणाऱ्याला सहज खिळवू व खेळवू शकते.

अशा या मराठीतील विनोदी साहित्य लेखनाचा श्रीगणेशा श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी या साहित्यिकांनी केला. श्रीपाद कृष्णांच्या 'सुदाम्याचे पोहे' संग्रहातून पांडूतात्या, बंडूनाना ही पात्रे भेटतात. त्यांच्यामार्फत व्यवहारातील हास्यास्पद गोष्टी पुढे येतात. गुंड्याभाऊ, चिमणराव ही चिं.वि. जोशींची पात्रे मनुष्य स्वभावाचे मासलेवाईक नमुने आपल्यापुढे उभी करतात. माणसांच्या त्रुटी, लहानशा इच्छा, अपेक्षा, स्वप्ने अत्यंत गंमतीदारपणे चि.वि. जोशींच्या लेखनातून वाचकांपर्यंत पोहोचतात. मग कधी ते 'गुड्याभाऊं'चे दुखणे असेल किंवा 'चिमणरावांची मोटार खरेदी' असेल. प्र. के. अत्रे यांच्या 'साष्टांग नमस्कार,' 'लग्नाची बेडी' या नाटकातून किंवा 'झेंडूची फुले' या विडंबन काव्य संग्रहातून त्यांचे निरीक्षण व मार्मिकता तर लक्षात येतेच, पण एखाद्या गोष्टीचा अतिरेक कसा विनोदाला पोषक ठरतो हे सुद्धा समजते. अतिशयोक्ती हे विनोदाचे महत्त्वाचे साधन असते. फँटसीमधून (अद्भुतरम्यता) विनोद



निर्माण होतो. रमेश मंत्रींच्या 'सचिवालयात हत्ती', 'तुम्ही मांजर व्हा' किंवा व.पु. काळे यांच्या 'बदली', 'भदे' या कथा फँटसीतील विनोदाचे उत्कृष्ट नमुने आहेत. पु.ल. देशपांडे यांनी 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकात व्यक्तिचित्रांमधून तसेच 'अपूर्वाई' सारख्या प्रवासवर्णनातून विनोदातील ताजेपणा दाखवून दिला आहे. 'परोपकारी गंपू', 'नामू परीट' 'नारायण', 'सखाराम गटणे' या वल्लींची स्वभाववैशिष्टचे विनोदी शैलीमुळे चिरतरुण झाली आहेत. 'मासिक मनोरंजन' च्या काळात विनोदी कथा प्रथम आली तरी, विनोदी कथांना स्वतंत्र स्थान मिळाले ते अंतरकरांच्या 'हंस', 'मोहिनी' या मासिकातून ! द. मा. मिरासदार, वसंत सबनीस, शंकर पाटील यांच्या विनोदी साहित्यशैलीचा आविष्कार कथांमधून झालेला दिसतो. एखादा अनपेक्षित शब्द, गोष्टीचा शेवट, हावभाव यामुळे आश्चर्य वाटून हसू येते. हास्य ही मुलभूत प्रवृत्ती आहे, मग भाषा येवो वा न येवो. पण हसणे म्हणजे विनोद नव्हे. विनोदाचा आस्वाद घेता आला पाहिजे. भोवती घडणाऱ्या घटना, अनुभवांकडे डोळसपणे पाहायला शिकणे आवश्यक आहे. नित्य दिनक्रमातील विसंगती बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. किंबहुना ही विसंगती, त्यामागील असहायता, कारुण्य कमीजण समजू शकतात. 'चितळे मास्तर', 'नारायण', 'अंतू बर्वा' या पु.ल.च्या व्यक्तिचित्रणातील माणसांची असहायता, निरागसता आणि कारुण्य विनोदांमागे दडलेले आहे. चिं.वि. जोशींसारखे लेखक, परिचित घडामोडी,



माणसे वातावरण यांच्याकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघतात आणि इतरांच्या लक्षात न येणारी गुंड्याभाऊ, चिमणरावसारखी चित्रे समोर येतात. या सर्वसामान्य माणसांचे बोलणे, वागणे, त्यांची फजिती यातून विनोद निर्माण करण्याचे कौशल्य लेखक दाखवतो.

'बटाट्याची चाळ' मधील विनोद रिझवतो आणि अंतर्मुखही करतो. गच्चीसाठी झुंजणारे चाळकरी, प्रत्येकाच्या उद्योगानुसार त्यांना आवश्यक वाटणारी गच्ची, 'चाळभैरव' नावाचे साप्ताहिक - हे सर्व मुळातूनच वाचावे असे आहे. ''गच्चीसाठी बटाट्याची चाळ झालीच पाहिजे'' यासारखी घोषवाक्ये किंवा पंतांचा उपास - त्यावर लोकांचे सल्ले, व्यायामविषयक सूचना व वाढलेले वजन यातील मार्मिकता आपण अनुभवतो.

विनोद समजून घेण्यासाठी किंवा ऐकण्यासाठी सुद्धा विशिष्ट परिस्थिती हवी.





वाट्टेल त्या स्थितीत माणूस विनोद ग्रहण करू शकत नाही. समोरची व्यक्ती ही विनोद समजणारी असावी लागते. कोटी आणि विनोद दोन्हीला बुद्धी व भावबळाची आवश्यकता असते. मार्मिकता हा महत्त्वाचा भाग विनोदात असल्याने, विनोद हे दोष मांडण्याचे प्रभावी शस्त्र आहे. राजकारण, धर्म, समाज, मनुष्यस्वभावाचे अवगुण, महागाई, सुधारणा, वीजप्रकल्प यासारख्या विषयांवर वृत्तपत्रे, मासिके यात येणारी व्यंगचित्रे, चुटकुले, फिरक्या, विनोदाच्या माध्यमातून वस्तुस्थिती चपखलपणे समोर मांडतात. विनोदामार्फत दोषदिग्दर्शन झाल्यामुळे समाज सुधारणेलाही त्याचा शर्करावगुंठित औषधाप्रमाणे उपयोग होतो. विनोदी साहित्यातून मनोरंजन होते, थोडा वेळ आपण दैनंदिन कटकटी विसरतो, हे जरी खरे असले तरी, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, पु. लं. देशपांडे आदी मान्यवरांचे लेखन केवळ मनोरंजनासाठी नाही तर सामाजिक त्रुटी, माणसांच्या विचारांची दिशा, मनोवृत्ती यावर केलेला उपहास, विडंबन असे त्याचे स्वरूप आहे. श्रेष्ठ विनोदी साहित्यिकांना जुन्या, श्रेष्ठ मूल्यांची घसरण होताना दिसते, त्यावर उपदेश वा भाष्य करण्यापेक्षा खेळकर शैलीतून, चिकित्सक व रसिक वृत्तीने विनोदाच्या माध्यमातून वाचकाला विचार

करण्यास प्रवृत्त करतात.

विनोदामुळे दैनंदिन रूक्ष वातावरणातील ताण कमी होतो. त्यामुळेच शिक्षण, वैद्यकीय, वकिली, बँका, कचेऱ्या, राजकारण, सिनेमा, खेळ अशा विविध क्षेत्रात त्या त्या व्यवसाय उद्योगानुसार विनोदाची निर्मिती होत असते. एकसुरीपणा व तोच-तोचपणा यामुळे प्रत्येकाला कंटाळा येतो. अशा वेळी कुणी एखादा विनोद सांगितला, शाब्दिक कोटी केली, समयसूचक वात्रटिका ऐकवली तर मन प्रसन्न होते. थकवा दूर होतो. गंभीर गोष्टींना सामोरे जाण्याची मनाची तयारी होते. धावपळ, आजारपण, निराशा, अपयश, उपेक्षा, लोकांचे मनाविरुद्ध वागणे या सर्वांपासून कुणी पळून जाऊ शकत नाही, पण असे थोडा त्रास कमी करणारे व मनाची जिद्द जोपासणारे शक्तिवर्धक म्हणजे विनोद होय.

विनोदी लेखन करणाऱ्या मंडळींना नव्या कल्पना, विषय कसे सुचत असतील, असा प्रश्न नेहमी पडतो. कारण वाचक व लेखक समान अनुभव घेत असले तरी लेखकाची प्रसंगाकडे बघण्याची दृष्टी, अनुभव घेण्याची वृत्ती वेगळी असते. त्यात विनोदी लेखनाचे बीज गवसते.



*हल्ली यांना केबल टी.व्ही. चं वेड लागलंय*

शाळा, रिक्षावाला, दुकानदार, सायकल-दुरुस्ती, रहदारी, सर्वांसमोरचे भाषण, संमेलन, वर्गातील प्रसंग अशा दैनंदिन गोष्टीतून विसंगत, गंमतीशीर असे काही शोधून वाचक विद्यार्थीमित्र लेखन करू शकतील. त्यात स्वत:ची मते, विचार खुसखुशीतपणे मांडून लिहिण्याचा प्रयत्न करायला हवा. या लेखनासाठी बारकावे टिपण्याची मार्मिकता हवी; व निरीक्षणाचा छंद लावून घ्यायला हवा. तसेच संस्कृत, हिंदी, इंग्रजी, मराठी भाषांमधील विनोदी साहित्याचे वाचनही करणे जरुरीचे आहे. आस्वाद घेताना लेखकाची भाषाशैली, वळण अभ्यासणे महत्त्वाचे आहे. आपल्या भोवतीच्या घटनांकडे बघण्याची विनोदी दृष्टी तयार झाली की विनोदप्रधान घटना निवडायला आपण शिकतो. त्यातूनच इतरांना न सुचलेले लिहून स्वत:ची सृजनशील कल्पकता अभिव्यक्त होईल. ''उत्तम विनोद हा समाजातील उच्च संस्कृतीचा निदर्शक असतो.'' असे प्र.के. अत्रे यांचे मत आहे. प्रसन्नता देणारे विनोदी लेख, कथा, किस्से यांचे संकलन व स्वत: विनोदी लिहिण्यास विद्यार्थीमित्र प्रारंभ करणार तर !

***

# मला कंचेंडू पाह्यजेय !

**सरिता पदकी**

निमगाव आपल्या नावासारखंच होतं. निम्मं खेडं, निम्मं शहर. म्हणजे शहरातल्या सगळ्या गोष्टी तिथं मिळत. दूरदर्शन संच देखील निमगावात मिळत, मग बाकीच्या गोष्टींची काय उणीव ! छान छान कपडे, भांडी, खेळणी घेऊन आपल्या खांद्यांवर किंवा हातगाड्यांवर ठेवून विक्रेते गावभर फिरत असत.

असाच एक विक्रेता होता नारायण. तो वेगवेगळ्या खोक्यांत छोटीमोठी खेळणी ठेवून हातगाडीत ती खोकी घेऊन गावातल्या रस्त्यांतून हिंडत असे. कशी कोण जाणे पण त्याच्या या फेरीची बातमी गावातल्या मुलांना कळत असे. शाळा संपवून घरी आलेली, शाळेत न जाणारी, नुसतीच रिकामी भटकणारी पोरंटोरं त्याच्यामागे लागत. वेगवेगळ्या खेळण्यांचे चकचकीत रंग पाहून त्यांचे डोळे चमकायला लागत.

असाच होता आपला गोपू – शाळा संपवून दप्तर पाठीला लावून रमतगमत घरी येणारा. त्यालाही रस्त्यात ही खेळण्यांची हातगाडी दिसली. तिच्यातल्या वेगवेगळ्या खेळण्यांच्या खोक्यांवरची नावं त्यानं वाचली आणि तो एकदम धावतच घरी आला. त्याची आई ओट्यावर तांदूळ निवडीत बसली होती. आपला मुलगा धापा टाकतच येतो आहे हे पाहून ती म्हणाली, ''अरे, हळूहळू, पडशील, पडशील !''

पण तिचं न ऐकताच गोपू म्हणाला, 'आई, मला कंचेंडू पाह्यजे कंचेंडू !



''काय पायजे?'' गोपूची मागणी नकळून आईनं आश्चर्यानं विचारलं.

''कंचेंडू'' गोपूनं पुन्हा सांगितलं.

''कंचेंडू? हा कसला चेंडू रे? हे कसलं खेळणं?'' आईनं पुन्हा विचारलं.


''ते मला माहीत नाही. पण खेळणीवाल्याच्या खोक्यात आहे. मी पाहिलं. मला आत्ताच्या आत्ता. पैसे दे, मी घेऊन येतो.'' खांद्यावरचं दप्तर जमिनीवर ठेवत गोपू आईपुढे हात पसरून उभा राहिला. आईचा चेहरा अजूनही आश्चर्यचकित पाहून त्यानं गळा काढायचा बेत केला.

पण तेवढ्यात गोपूचा दादा घरी आला. तो दहावीत होता. गोपू हात पसरून रडायच्या बेतात आणि आई त्याच्याकडे आश्चर्यानं थक्क होऊन पाहत असलेली, हे दृश्य पाहून त्यानं विचारलं ''आई, काय झालं गं? आज काय पाह्यजेय तुझ्या लाडोबाला?''

''बघ बाबा मला तर काही समजेना झालंय. काय म्हणे तर कंचेंडू पाहिजे.'' ''होय, होय कंचेंडू पाहिजे.'' गोपू ठासून म्हणाला, ''कंचेंडू? तो कुठे मिळतो?'' दादानंही आता चकित होऊन विचारलं.

''त्या खेळणीवाल्याजवळ. चल चल तो बघ गाडी घेऊन चाललाय.'' गोपू दादाला ओढायलाच लागला.

जवळजवळ धावतच गोपू आणि दादा खेळणीवाल्याच्या गाडीजवळ आले. रोजच्या



सारखीच त्याच्या भोवती मुलं जमली होती. त्यांच्यातूनच वाट काढीत गोपू दादाला घेऊन गाडीतल्या खोक्यांजवळ आला आणि एका खोक्याकडे बोट दाखवून म्हणाला ''बघ बघ, त्या खोक्यांत कंचेंडू आहेत. मला एक कंचेंडू पायजे. पायजे म्हणजे पायजेच !''

दादा बघायला लागला ... खरंच की ! त्या खोक्यावर कंचेंडू असं लिहिलं होतं ! आत मजेमजेशीर शब्द लिहिलेले दिसले. खुळखु, ळेभोव, रेटिकटि आणि कंचेंडू ! असे शब्द होते. अरेच्या ही कसली वेगळीच खेळणी या बाबाकडे आहेत बुवा अशा विचारात दादा पडला.

''अहो, मला एक कंचेंडू देता का?'' दादा खेळणीवाल्याला म्हणाला.

''आं? काय पायजे?'' तो बाबा विचारता झाला आणि पसारा आवरत त्यानं खोकी नीट लावली.

आता दादाचं लक्ष इतरही खोक्यांकडे गेलं. त्याच्यावरही नावं होती – खुळखु ळेभोव, रेटिकटि आणि कंचेंडू आता खोकी एकाला एक लावल्यामुळे ती नावंही एका ओळीत आली, खुळखुळेभोवरेटिकटिकंचेंडू.

काय गंमत झाली ते दादाच्या लक्षात आलं आणि तो मोठमोठ्यानं हसायला लागला. गोपू त्याच्याकडे बघतच राह्यला.

''अरे, कंचेंडू कसला मागतोस? नीट वाच त्या खोक्यांवरची नावं म्हणजे कळेल. बावळट कुठला !'' हसतहसत दादा म्हणाला. गोपूनं नावं वाचली.

खुळखुळे, भोवरे, टिकटिकं, चेंडू ! आणि तो दादापेक्षाही मोठ्यांदा हसत घरी आला !

त्या दोघांकडे पाहत आई उठली आणि त्यांच्या जेवणाच्या तयारीला लागली.

त्यानंतरही कित्येक दिवस गोपू लंगडी घालत, मोठमोठ्यांनी म्हणे

''खुळखु ळभोव रेटिकटि, कंचेंडू''

''कंचेंडू रे कंचेंडू !''

***

# परीक्षेच्या आदला दिवस

**मंगला गोडबोले**

''परांप्पे, वर्षातला सगळ्यात मोठा दिवस कोणता?'' एके दिवशी बाईंनी मला विचारलं, तेव्हा माझं नेहमीप्रमाणेच वर्गात लक्ष नव्हतं. एक तर केव्हाही माझं 'परांजपे' हे आडनाव त्यांनी 'परांप्पे' असं उच्चारलं की मला आपलं फिसकन् हसू यायचं. जकातदार, महाजन, गांजवे असली काही आडनावं 'ज' गाळून म्हटली तर कानाला कशी वाटतील हा खेळ मनातल्या मनात सुरू व्हायचा. त्यात त्या दिवशी रस्त्यावरून एक वरात चालली होती. ती बघण्यात परांप्पे गर्क होती. बाईंनी पुन्हा विचारलं, ''लक्ष कुठंय परांप्पे? सगळ्यात मोठ्ठा दिवस सांगत्येस ना?''

''हो बाई''

''कुठला?''

''परीक्षेच्या आदला दिवस'' मी धाडकन सांगून टाकलं. सगळा वर्ग अवाक् झाला. खगोलशास्त्रानुसार लहानात लहान दिवस, मोठ्यात मोठा दिवस असं सगळं शिकवून झाल्यावर बाईंनी हा प्रश्न विचारलेला होता. माझं उत्तर मानसशास्त्राशी जास्त इमान राखणारं होतं. कोणत्या जिवंत मनाला परीक्षेचा आदला दिवस लांबच लांब वाटत नसेल बरं?

गंमत म्हणजे आयुष्यात इतक्या परीक्षा दिल्या, त्या खास काही आठवत नाहीत. आठवतात ते परीक्षांचे आदले दिवस. लांबच लांब पसरत गेलेले, न संपणारे, कंटाळवाणे आदले दिवस. प्रत्यक्ष परीक्षा



पटकन संपतात. हातात कोरी उत्तरपत्रिका येते आणि भल्याबुऱ्या प्रकारे दोनअडीच तासात भरवून परत केली जाते. परीक्षेच्या अगोदरचा दिवस कोराच येतो आणि कोराच जातो. जातो कुठला ? नेटानेटाने ढकलावा लागतो. नव्यानं करण्याजोगं काही काम नसतं त्या दिवसापुढे. जो काही अभ्यास करायचा असतो तो वर्षभरात झेपला नाही तो त्या शेवटच्या दिवशी उरकण्याची काही आशा नसते. शिवाय एकदम सगळाच अभ्यास चोख आला तर न जाणो, पहिले बिहिले येऊ हे टेन्शन ! पहिलं येऊन आपलंच इतक्या वर्षांचं रेकॉर्ड आपण मोडणं योग्य नसतं. काय करावं, काय करू नये याचा विचार करत करतच तो दिवस ढकलायला लागतो. फक्त विचार ! कृती नाही !

बाकी परीक्षेच्या आदल्या दिवशी आपल्याला कृती करू देतो कोण? एरवी सारखं 'हे कर', 'ते कर' म्हणून मागे लागणारे घरचे लोक त्यादिवशी ''ते-हे करू नको रे बाबा'' असं विनवत राहतात. ''काही नकोस माळ्यावरचं सामान काढायला. कुठे उगाच पाय घसरून पडझड नको व्हायला.''

''त्याला नका हो बाजारात पाठवू. ऊन केवढं आहे... उद्या डोकं बिकं दुखलं तर?''

''माझे आई, कांदा चिरायचं काही अडलेलं नाहीये. नेमकं नको तेव्हा बोट कापून घेशील.''

असं म्हणून सारख्या आपल्या कामसूपणावर घाला घातला जातो. आपण बाबा पहिल्यापासून कष्टाळू. केव्हाही, कोणतंही काम करायला एका पायावर तयार. परीक्षेच्या आदल्या दिवशी पेन्सिलीला जिवापाड टोक करताना बोटं ब्लेडनं कापून घ्यावीत यासारखा सुखद अनुभव नाही. गणिताच्या पेपरच्या आदल्या दिवशी ''पोटात कळ येऊन ढोपर दुखावं'' ही प्रार्थना पाडगावकरांच्या भोलानाथलाही केल्याची आठवत्ये ना? आपण तेवढंही मागत नाही. फक्त हाताचा अंगठा झकासपैकी कापावा किंवा पायाची करंगळी मस्तपैकी ठेचावी. पेपरच्या हॉलपर्यंत जाता तरी येऊ नये किंवा गेलं तर लिहिता तरी येऊ नये इतकंच आपण मागतो. पण परीक्षेच्या आदल्या दिवशी घरच्यांना



आज काल टी.व्ही. वर पूर्वीसारखा [illegible] नाही रे, त्यामुळे अभ्यासाला वेळच मिळत नाही.

आपल्या प्रेमाचा इतका कढ येतो की ही छोटी स्वप्नंसुद्धा पूर्ण होत नाहीत. आई तर फारच कमाल करते. बसल्या जागी दुधाचा कप आणून देते. येता जाता पाठ थोपटते. फारच लाडात आली तर ''झी. टी. व्ही. बघत बस'' असंही म्हणते. परीक्षेच्या आदल्या दिवशी प्रत्येक आई ही अगदी सहज ''प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधु आई'' होऊन जाते. मला तर वाटतं ह्या ओळीसुद्धा त्या कवीनं परीक्षेच्या आदल्या दिवशीच लिहिल्या असाव्यात. निकालाच्या दिवशी जर कविता लिहिली असती तर हेच शब्द ''क्रोधस्वरूप आई... वात्सल्यबिंदु आई'' अशा प्रकारे बदलले गेले असते.

असं बरंच काही बदलत जातं. पण परीक्षेच्या आदला दिवस मात्र अजिबात बदलत नाही. माझ्या लहानपणापासून, माझ्या मुलांच्या लहानपणापर्यंत मी तो जसाच्या तसाच बघते आहे. परीक्षेच्या आदल्या दिवशी माझ्या मुलीला तिचं अभ्यासाचं डेस्क आवरण्याची उबळ येते आणि ते काम तिनं करू नये म्हणून मी चंग बांधते. मग ती बसल्या-बसल्या चिमण्यांना हाकलते, खिडकीमधील मुंग्यांची रांग मारते किंवा पुस्तकाची पानं उगाचच पुढेमागे फडफडवते. क्रमिक पुस्तकात पानांमागून पानं, तिनं काढलेल्या लाल रेघा, जांभळे ठिपके, बाण, प्रश्नचिन्ह आय.एम.पी. चे इशारे वगैरे दुरून बघूनही माझी मस्त करमणूक होते. बरंच आय.एम.पी. तिनं

शेवटच्या दिवशी करण्यासाठी राखून ठेवलेलं आहे आणि नेमकं तेवढंच करायचं ती अचूक विसरणार आहे हे कळण्याइतकी परीक्षावारी मलाही घडली आहेच ना ?


तसं म्हटलं तर परीक्षेच्या आदल्या दिवशी असली स्मरणशक्ती एकदम ओव्हरटाईमवर काम करते. फक्त नेमकं काय लक्षात ठेवायचंय हे तेवढं लक्षात राहत



नाही. एरवी नाही नाही ते आठवतं. ताजंताजं जेवढं डोक्यात कोंबावं तेवढं सामावण्यासारखं डोकं एकदम मोठंमोठं होत जातं. मग तुम्ही अपोलोनिअसचं प्रमेय कोंबा, नाहीतर ल्यबन्त-तुबन्त, धातुसाधितं कोंबा, त्या रात्रभर आणि दुसऱ्या दिवशी दुपारी पेपरपर्यंत मेंदू तो भार बिनतक्रार वाहतो. इकडे सुपरवायझरनं आपली विद्वत्ताप्रचुर उत्तरपत्रिका हातात घेतली की तिकडे मेंदूही सगळं ओझं झटकन् खाली टाकून मोकळा होतो. इथून पुढे वर्षभर त्याला आराम. निदान पुढच्या परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत तरी नक्कीच !



हा पुढच्या परीक्षेचा आदला दिवस हेही एक प्रकरणच असतं. अजून आख्खं वर्ष आहे, सहा महिने आहेत, भलाभक्कम महिना आहे असं म्हणेम्हणेपर्यंत एकदम परीक्षा उद्यावर येऊन ठेपते. म्हणजेच परीक्षेच्या आदला दिवस उगवतो. परीक्षेच्या अगोदरचा पाचवा, चौथा, तिसरा, दुसरा दिवस उगवावा पण ‘तो दिवस’ तेवढा टळावा असं आपल्याला खूप वाटतं. पण सूर्य काही एवढं सोयीनं घेत नाही, तो आपल्याला आकस्मिक आदल्या दिवसावर नेऊन आदळतो. ह्या धक्क्यानं



आपलं मन दोलायमान होतं. पाण्यानं भरलेली बादली दाणकन् आदळली तर ती नाही का हेंदकाळत? तोच प्रकार. आपलं

मन कायमचं त्या दिवसभर डळमळीत राहतं. कधी क्षणात वाटतं, या वेळी फारच अभ्यास झालाय बुवा आपला. बहुतेक आपण संस्थेचं गेल्या दहा वर्षाचं किंवा विद्यापीठाचं रेकॉर्ड मोडणार. निदानपक्षी ९३.९४ टक्क्यांना तरी मरण नाही. बक्षिसांची रेलचेल होणार. सत्कार समारंभाला घालण्याजोगा ड्रेस आपण मनोमन शोधायला लागतो. इस्त्रीबिस्त्री करून ठेवतो. 'आजच्या माझ्या यशात अ, ब, क, ड, इ चा वाटा आहे' हे भाषणही मनात तयार व्हायला लागतं. आपल्या इतक्या हुषार माणसाला एखाद्या किरकोळ भाषणाची काय काळजी पडणार? मी तर मनातल्या मनात अशा भाषणांची प्रॅक्टीस करतकरतच पुढे सराईत वक्ती झाले आहे. पण हे असतं मनाच्या दोरीचं एक टोक. दुसऱ्या टोकावर दारुण निराशा असते. फक्त परीक्षेच्या आदल्या दिवशीच अनुभवता येईल अशी खोल, गडद, दारुण निराशा. क्षणापूर्वी सत्कारचं भाषण तयार करणारे आपण त्या निराशेच्या गर्तेत गेलो की म्हणायला लागतो, यंदा काही खरं नाही बुवा. अभ्यास काहीच झालेला नाही. वेळ नव्हता. मूड नव्हता. पुस्तकं सापडत नव्हती. डेस्कवरचा दिवा लागत नव्हता. खिडकीवर चिमण्या येऊन फारच त्रास द्यायच्या. समोरचे जोशीकाका टी.व्ही. मोठ्यांदा लावतात. उन्हाळ्यात फार उकडतं. थंडीत थंडी पडते. एकूण काय, कधीच अभ्यास झालेला नाहीये आपल्या हातून. यंदा बहुधा ह्याच वर्गात राहून अभ्यास पक्का करावा लागणार. नापासाचा शिक्का बसणार पाठीवर. मग आपण कचकचीत दोन दिवस रडत बसणार. प्रत्येक जेवणानंतर काही तास उपास करणार. घरातल्या घरात केस पिंजारून शून्यात बघत बसणार. जमल्यास एखादा फर्लांग अंतरावर पळूनही जाणार की लगेच पेपरमध्ये निवेदन. ''तू जिथे असशील तिथून परत ये. आईनं अन्न सोडलं आहे. बाबांनी अंथरूण धरलं आहे. सगळं घरदार तुझ्या काळजीत आहे. तुला कोणीही रागावणार नाही.'' या निवेदनासोबत छापायला आपला एखादा फोटो असावा म्हणून त्याची शोधाशोधही आपण सुरू करतो. उगाच फोटोअभावी निवेदन रहायला नको.

प्रत्यक्षात आपणतुपण लोक एवढी कोणतीच तड गाठत नाही. नापासही होत नाही आणि पहिलेही येत नाही. पेपरात घोळ घालून आपण आपली सरासरी नेहमीचीच ठेवतो. परीक्षेच्या आदल्या दिवशी झालेला पश्चात्तापही विसरतो. लागलेला निकाल आवर्जून लक्षात ठेवण्याजोगा नसतोच. त्यामुळे तो तर आपण तत्काळ विसरतो. सगळ्या नावडत्या गोष्टी अशा घाईघाईने विसरून टाकल्या की रमतगमत, तरंगत, भटकत वेळ घालवायला आपण मोकळे होतो.

निदान पुढच्या परीक्षेच्या आदला दिवस येईपर्यंत तरी ! तो दिवस किती दूर असतो... आणि किती जवळही !

***


**छात्र प्रबोधनच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा ! 'हेजीब' सौमित्र गोसावी, पुणे.**

# गणितज्ञांच्या गमती

**डॉ. जयंत नारळीकर**

गणितज्ञांची प्रतिमा जनसामान्यांपुढे असते ती ‘विसरभोळे’, ‘मुलुखावेगळी माणसे’, ‘तऱ्हेवाईक’ अशा विशेषणांची असते. ज्या मेंदूत असामान्य प्रतिभा आहे त्यात किंचित् वेगळेपणा असल्यास नवल नाही. अशा काही गणितज्ञांचे हे किस्से.

**ऑयलर आणि देवाचे अस्तित्व**

ऑयलर नावाचा गणिती (इ.स. १७०७-१७८३) रशियाच्या प्रख्यात सम्राज्ञी कॅथरीन यांच्या दरबारात आश्रयाला होता. गणिती म्हणून ऑयलरचा दबदबा युरोपात होता. (केनिग्सबर्गच्या सात पुलांच्या प्रश्नावरील लेखात ऑयलरचा उल्लेख आहे.) एकदा कॅथरीनच्या राज्यात देनीस दिदेरो नावाचा निरीश्वरवादी तत्त्ववेत्ता आला. त्याच्याशी वादविवाद करायला कोणीच पुढे येईना, कारण त्याच्या मुद्देसूद विवेचनावर कोणाकडेही उत्तर नव्हते. अखेर ‘दरबारे कॅथरिनी’ ची लाज राखायला सम्राज्ञीने ऑयलरला पाचारण केले. ऑयलरला माहीत होते की, तत्त्ववेत्ता महाशयांचे गणित कच्चे आहे. त्याने एक समीकरण लिहिले -

$$\frac{a+b^n}{n} = x$$

आणि म्हटले ‘‘म्हणून देव अस्तित्वात आहे.’’ ह्या युक्तिवादाने हतप्रभ होऊन तत्त्ववेत्ता महाशयांनी पळ काढला.

**लप्लास आणि नेपोलियन**



न्यूटनच्या गुरुत्वाकर्षण आणि गतीच्या नियमांना लोकप्रियता लाभली. त्याचे एक कारण म्हणजे लप्लास नावाच्या फ्रेंच गणितीमहाशयांनी त्यांचा केलेला पाठपुरावा. एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला लप्लास यांनी अख्ख्या सूर्यमालेतील (त्यावेळी ज्ञात असलेल्या) ग्रह-उपग्रहांच्या संपूर्ण गतीचे गणिती विवेचन करणारा पाच खंडी ग्रंथ लिहिला. आकाशातील ग्रह-उपग्रह न्यूटनच्या सिद्धांताबरहुकूम फिरत आहेत, हे लप्लासनी उत्कृष्टपणे सिद्ध केले.

हा ग्रंथ त्यावेळचे फ्रान्सचे सम्राट नेपोलियन यांना भेट द्यायला लप्लास राजदरबारी गेले तेव्हा नेपोलियनने तो ग्रंथ चाळून विचारले ‘‘यात देवाचा उल्लेख कुठे दिसत नाही?’’

तेव्हा लप्लास उत्तरले, ‘‘मला ते गृहीतक आवश्यक वाटले नाही.’’

**मितभाषी डिरॅक**

केंब्रिज विद्यापीठातील गणिताचे प्राध्यापक पॉल ॲड्रियन मॉरिस डिरॅक हे मोजके बोलण्याकरता प्रसिद्ध होते. विचाराल तेवढ्या प्रश्नांची उत्तरे देतील - कमी नाही... जास्त नाही आणि आपण होऊन बोलायचा विषय काढणार नाहीत.

एकदा ते एका अमेरिकन दाम्पत्याकडे काही दिवस वास्तव्याला होते. क्वांटम सिद्धांताचा गणिती पाया रचणारा, नोबेल पारितोषिक विजेता घरी पाहुणा येणार म्हणून

नवरा बायकोनी जय्यत तयारी केली. 'डिरॅक' हे नाव फ्रेंच (– डिरॅक यांचे वडील फ्रेंच होते) तेव्हा डिरॅक फ्रेंच भाषा बोलत असतील असा तर्क करून त्या दोघांनी स्वत:चे मोडके तोडके फ्रेंच शक्य तितके 'पॉलिश' केले आणि डिरॅक यांच्या वास्तव्यात इंग्रजी टाळून तीच भाषा सातत्याने वापरली. त्यासाठी बिचाऱ्यांना पुष्कळ मेहनत घ्यावी लागली.

डिरॅक परत जायला निघाले तेव्हा दोघांनी त्यांच्याजवळ दिलगिरी व्यक्त केली. ''आमची भाषा इंग्रजी, पण तुम्हाला कळावी म्हणून आम्ही मोडकी तोडकी का होईना फ्रेंच भाषा वापरली – त्यात चुका असणार ! पण नाईलाज झाला हो.''

''पण मला इंग्रजी भाषा कळते की – मी नेहमी तीच वापरतो,'' डिरॅक म्हणाले.

''मग तुम्ही आम्हाला आधीच तसे का सांगितले नाही? आम्ही इंग्रजी वापरली असती.'' खट्टू होऊन गृहिणी म्हणाली.

''कारण तुम्ही मला तसे विचारले नाहीत.'' डिरॅक उत्तरले.

**संगणकी डोक्याचा फॉन नॉयमान**

डेक्कन क्वीन पुण्याहून सकाळी सव्वा सातला बाहेर पडली आणि समजा त्यादिवशी मुंबईला सकाळी सव्वा अकराला पोहोचली. पुणे–मुंबई अंतर २०० किलोमीटर धरा. तशीच एक गाडी डेक्कन एक्सप्रेस सव्वा सातला मुंबईहून पुण्याकडे यायला निघाली. दोन्ही गाड्या त्याच वेगाने एकमेकीकडे येऊन त्यांची टक्कर झाली. दरम्यान एक माशी १००

डोडो डेंटिस्ट आणि कोको केमिस्ट प्रवासाला निघाले होते. डेंटिस्ट म्हणजे दंतवैद्य आणि केमिस्ट म्हणजे वैद्यकीय वस्तू विकणारा. वाटेत त्यांना जांभळ्या ज्वराने पछाडले. दोघांनाही बारीक ताप येऊ लागला आणि अंगं जांभळी पडली. एका रानटी माणसाने सांगितले की, ''अमक्या ठिकाणी तमके तमके झाड आहे. त्याचे फळ खा, म्हणजे ताप तेव्हाच हटेल.'' लगेच डोडो आणि कोको त्या जागी गेले.

तिथे ते फळझाड होते खरे, पण ते काट्यांनी इतके गजबजले होते की त्याला हात लावून फळ तोडणे म्हणजे एक कसरतच होती. डोडो मागे होत म्हणाला ''कोको तू केमिस्ट आहेस. ही फळं नि रसायन म्हणजे तुझ्या हातचा मळ. तेव्हा तूच पुढे हो.''

बिचारा कोको पुढे झाला आणि अनंत ठिकाणी अंग ओरबाडून घेतल्यावर त्याने एक फळ तोडले. रस पोटात जाताच दोघांचेही दुखणे पळाले. मग पुढचा प्रवास सुरू झाला.

वाटेत लागली नदी. त्या नदीत अर्धा डझन मगरी आ करून उभ्या होत्या. उडाली दोघांची फेफे ! आता नदी ओलांडणार कशी?

लगेच कोको केमिस्ट हटला आणि डोडो डेंटिस्टला पुढे लोटीत म्हणाला ''डोडो या मगरीच्या कवळ्या मोजून घे ! त्यांचे दात पाडणे म्हणजे तुझ्या हातचा मळ आहे तेव्हा आता तूच पुढे हो !''

(भारभर गवत मधून)

कि.मी. वेगाने डेक्कन क्वीन सुटली तेव्हा तिच्या इंजिनावरून मुंबईकडे निघाली. वाटेत डेक्कन एक्सप्रेसचे इंजिन भेटले त्यावर टप्पल मारून माशी उलटी फिरली. अशा त्या माशीच्या फेऱ्या दोन्ही इंजिनांच्या दरम्यान चालू होत्या. तिचा शेवट झाला तेव्हा ती दोन्ही इंजिनामध्ये चिरडली गेली. तर अशा मागे पुढे घातलेल्या फेऱ्यात त्या माशीने किती अंतर उड्डाण केले.

हा प्रश्न सोडविण्याचे दोन मार्ग आहेत. गाड्यांचे वेग आणि माशीचा वेग माहीत असल्याने तिच्या प्रत्येक फेरीचे अंतर मोजता येते. माशीच्या मागे पुढे अशा अनंत फेऱ्या झाल्या; पण प्रत्येक फेरीचे अंतर भूमितीश्रेणीने कमी होत गेले. त्या श्रेणीची बेरीज करून उत्तर मिळते. पण हा मार्ग (तुम्हीच तपासून पाहा) भलता किचकट आहे. उत्तर मिळवण्याचा दुसरा मार्ग म्हणजे त्या गाड्यांची टक्कर किती वेळाने झाली ते शोधणे आणि त्या कालखंडात (म्हणजे २ तासांत) माशी किती उडाली त्याचा हिशोब लावणे (उत्तर २०० कि.मी.)

जॉन फॉन नॉयमान ह्या प्रख्यात शास्त्रज्ञाने संगणकाच्या गणितावर आणि तर्कशास्त्रावर पुष्कळ मौलिक संशोधन केले होते. त्याला अशा सारखा प्रश्न विचारला तेव्हा त्याने पटकन बरोबर उत्तर दिले. त्याला प्रश्नकर्त्याने विचारले ''तुम्ही हा कसा सोडवलात?'' तेव्हा फॉन नॉयमान यांनी चकित होऊन उत्तर दिले ''का? सोडवण्याचा एकच मार्ग आहे ! मी त्या माशीच्या फेऱ्यांच्या श्रेणीची बेरीज केली !''

मनातल्या मनात केवढं मोठं गणित चुटकीसारखे सोडवणाऱ्या फॉन नॉयमान यांना दुसरा सोपा मार्ग सुचलाच नाही.



**विसरभोळे वीनर**

अमेरिकेतले गणितज्ञ नॉर्बर्ट वीनर बद्दल हा किस्सा सांगितला जातो. ते भयंकर विसरभोळे! त्यांचे सर्व दैनंदिन जीवन त्यांच्या पत्नीवर अवलंबून असे. तीच त्यांचे सर्व व्यवहार सांभाळी.

एकदा वीनरसाहेब नेहमीप्रमाणे कामाला निघाले. त्यांना कारमध्ये बसवून निरोप देताना सौ. विनरनी बजावले, ''आपण हे घर आज विकले आहे आणि दिवसभर आम्ही सामान नव्या घरी नेत आहोत. तुम्ही आपल्या कामाला नेहमीसारखे जा. पण परत येथे येऊ नका. हा नव्या घराचा पत्ता.'' लेखी पत्ता घेऊन वीनर ऑफिसला गेले.

पण सर्व सूचना विसरून ते नेहमीसारखे संध्याकाळी पहिल्याच घरी आले. घराला कुलूप, आत दिवे नाहीत. हा काय प्रकार आहे हे त्यांना कळेना. इतक्यात घराच्या फाटकाजवळ त्यांना एक मुलगा दिसला. त्याला त्यांनी विचारले, ''काय रे मुला, वीनर कुटुंब इथेच राहत होते ना... ते कुठे गेले?''

तो मुलगा उत्तरला ''बाबा, आईनेच मला इथे पाठवले. कारण तुम्ही नेहमीसारखे इथेच येणार असा तिचा अंदाज होता. चला मी तुम्हाला आपल्या नव्या घरी नेतो.''

***

## गंमत घर

शालू, नेसते शालू
ऐटीत लागते चालू।
नंदू जमवतो नाणी
चिल्लर मागा कोणी।
छबी चालते छुमछुम
नाचताना होते घामाघुम।
बाबा हपीसात जातात
पत्ते खेळून घरी येतात।
आई शिकते भजन
तिचे मंडळात कीर्तन।
आजोबा गोष्ट सांगतात
पाय चेपून घेतात।
आजी करते जप
साऱ्यांना म्हणते – 'गप' !
बंटी सारखा भुंकतो
एकटा ठेवला तर रडतो।
मी आपला कविता करतो
कागदावर कागद फाडतो
असे आमचे गंमतघर
दाखवतील का टी.व्ही. वर?

**संजीवनी मराठे पुणे.**

## मिनी दासबोध - ड्रायव्हरची लक्षणे


जो थांबतो केव्हाही भररस्त्यात। नाही सिग्नल मानत।
पोलिस नाही काही करत। तो सायकलस्वार ओळखावा ।।१ ।।
जो दामटतो रिक्षा गर्दीत। तरीसुद्धा जोरात।
जो मृत्यू साक्षात। रिक्षा ड्रायव्हर ओळखावा ।।२ ।।
ज्याची गाडी ऐटदार। श्रीमंतीचा रुबाब फार।
जो सर्वा तुच्छ गणणार। तो कार ड्रायव्हर ओळखावा ।।३ ।।
शक्तिमान वाहन चालवित। नाही कोणा जुमानत।
वाटे येई त्याला उडवित। तो ट्रकड्रायव्हर ओळखावा ।।४ ।।

**भार्गव अभ्यंकर इ. ७ वी**

### माकड माझे नाव

माकड माझे नाव, जंगल माझे गाव,
झाडावरूनि उड्या मारण्याची मलाच आहे हाव....
मेंदूने मी विकसित खरोखर
अन् हरविले सातही सागर,
खाली गेलो मरियाना ट्रेंचवर।
नेम माझा घेत चालला शत्रूचा ठाव ।।१ ।।
मीच इथे झाडावरती
फळे धरूनी उजव्या हाती
दुखावली ही माणसे सगळी
माणसाच्या त्या नाकावर हसत घातला घाव ।।२ ।।

**पुष्यमित्र नवरे इ. ७ वी**



# हजरजबाबीपणा आणि विनोद !



**डॉ. विश्वास मेहेंदळे**

कुणीही माणूस, मग तो कोणत्याही क्षेत्रात काम करणारा असो, थोडासा हजरजबाबी हवाच. तसा तो असला तर भोवातलचं वातावरण आनंदी, उत्साही, विनोदी असं वातावरण तो मस्त ठेवू शकतो. सभोवताली असलं तर काम करायला, विशेषत: जास्तीचं काम करायलाही खूप हुरूप येतो. तसं नसलं तर मात्र एक प्रकारची मरगळ येते. हा अनुभव राजकीय नेत्यांच्या बाबतीत अगदी आवर्जून येतो. त्यांच्या त्या धकाधकीच्या जीवनातही ते खूप हजरजबाबी राहतात आणि भोवतालचं



वातावरण आनंदी, उत्साही ठेवतात.

अशा या राजकीय नेत्यांमध्ये ज्यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे अशांच्यामध्ये खासदार श्री. अटलबिहारी वाजपेयी, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. बाबासाहेब भोसले, नामदार श्री. सीताराम केसरी, मध्य प्रदेशातले एक मान्यवर कवी आणि खासदार श्री. बालकवी बैरागी, या आणि अशा किती तरी राजकीय नेत्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. यातल्या सगळ्याच मंडळींच्या हजरजबाबीपणाची उदाहरणं या ठिकाणी देणं शक्य नाही. पण काहींची उदाहरणं ही मोठी गंमतीदार वाटणारी आहेत.

श्री. अटलबिहारी वाजपेयी हे अशा हजरजबाबी नेत्यांचा जणू बादशहाच आहेत. एखाद्या घटनेकडं, प्रसंगाकडं, गोष्टीकडं ते इतक्या हजरजबाबीपणानं बघतात की त्यातून नकळत पण अतिशय दर्जेदार अशी विनोदनिर्मिती होताना दिसते. काही दिवसांपूर्वी अटलजी परराष्ट्रमंत्री असताना मुंबई दूरदर्शन कार्यक्रमात मुलाखत द्यायला आले होते. मुलाखतीची सारी पूर्वतयारी झालेली होती. स्थानापन्न झालेल्या अटलजींना ध्वनिक्षेपक नीट चालतो आहे, हे पाहण्यासाठी त्या ध्वनिक्षेपकात काही तरी बोलण्याची विनंती करण्यात आली. तेवढ्यात दूरदर्शनवर आपल्याला कायम दिसणारी ती माशी अटलजींच्या भोवतीही घिरट्या घालू लागली. ते अटलजींच्या लक्षात आलं. ध्वनिक्षेपकांच्या

चाचणीकरता काय बोलायचं हा विचार करीत असणारे अटलजी त्या माशीकडं बघत म्हणाले, 'आप के यहाँ मखियाँ बहुत हैं।' सारे कर्मचारी एकदम चरकले. त्यानंतर अटल बिहारी लगेच म्हणाले, 'इतना काफी है या और कुछ बोलूं!' त्यावर सारेच एकदम हसले आणि वातावरणात एकदम फरक पडून साऱ्यांच्या मनावरचा ताण एकदम कमी झाला.

असंच एकदा राजधानी दिल्लीमध्ये कुठं तरी इंदिराजींनी एक सवाल केला की, '१९४२ का आंदोलन हुवा तब यह सारे जनसंघी कहाँ थे?' त्या प्रश्नाचं वाजपेयींनी उत्तर दिलं दुसऱ्याच एका जाहीर सभेत. ते म्हणाले, 'हमें पूछते है कहाँ थे हम! हम बता देना चाहते है श्रीमती गांधी को, नेहरु पुत्री और संजय माताको, प्रधानमंत्रीजी को, हम गंगा में थे, कछ में थे, पंजाब, सिंध में थे, हम कहाँ नहीं थे। हम तो सारी जगाहो में थे।' एकेका शब्दाचे दोन-दोन चार-चार प्रतिशब्द देण्याची त्यांची हातोटीही विलक्षण होती, आहे. ते म्हणाले, 'इंदिराजी आम्हाला विचारतात की १९४२ साली जनसंघ पक्ष कुठं होता? पण त्या वेळी आमच्या पक्षाची स्थापनाच झालेली नव्हती, तर आम्ही कुठं असणार! आम्ही स्वतंत्रपणे वावरतच होतो. तेव्हा १९४२ साली जनसंघ जर स्थापनच झालेला नव्हता तर तो कुठं असणार !' हे सांगतानाच त्यांनी असंही सांगितलं की, '१९४२ की बात छोड दिजीये, १८५७ का जो आंदोलन हुआ तब इंदिराजी आप और आप की काँग्रेस पार्टी कहाँ थी? जब हम पैदाही नहीं हुए थे तो कहाँ हो सकते है!' असं मुंहतोड, हजरजबाबी उत्तर देऊन दर्जेदार विनोद निर्माण करण्यात अटल बिहारी वाजपेयी यांचा हातखंडा होता.

असंच एकदा वाजपेयींना कुणी तरी विचारलं की 'आप बार बार हाथ उठाकर भाषण क्यों देते हो ! बार बार हाथ उठाकर



भाषण देने की आवश्यकता नही है। जो कहना है वो साफ सुथरा कहिये' त्यावर वाजपेयी म्हणाले, 'आपको क्या दिक्कत है। आप नाराज क्यों हो जाते है, मेरा हात उपर उठनेपर। त्यावर ती व्यक्ती म्हणाली, 'आपका हाथ जब उपर उठता है तो हमे हिटलर जैसे बादशाह की याद आती है।' त्यावर न रागवता, न चिडता वाजपेयी त्या गृहस्थाला म्हणाले 'बात सही है। गलत नही है। मगर हमने जो भी वक्ता देखे हैं, वे अपना हाथ ही उठाकर भाषण देते हैं, पैर उठाकर भाषण देनेवाला वक्ता हमने कभी नहीं देखा है।' आणि जमलेल्या मंडळीत प्रचंड हशा पिकला.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर बाबासाहेब भोसले हेही असेच गंमतीशीर बोलायचे. रागावून तावातावानं काही कुणी बोलू लागलं की त्याच्या रागाचा पारा एकदम खाली आणण्यात बाबासाहेब फार चतुर. असा काही विनोद करतील की ऐकणारा एकदम गारच होऊन जाई. असे ते एकदा विधान भवनात काही आमदारांशी बोलत बसले होते. हास्य विनोद करीत होते. गप्पा चांगल्याच रंगात आल्या होत्या. अचानक एक आमदार रागारागानं माजी मुख्यमंत्र्यांच्याकडं आले आणि म्हणाले, 'अहो सरकार तुम्ही आमची काही माणसं तुरुंगात डांबली आहेत, त्यांना ताबडतोब मोकळं करा, नाहीतर हाऊसमध्ये (म्हणजे विधान सभेत) आम्ही गडबड करू.' ते आमदार खूपच रागावले होते.




त्यांचं स्वागत करीत मुख्यमंत्री म्हणाले. 'अहो बसा तरी आमदारसाहेब. अरे चहापाण्याचं बघ. साहेब भलतेच रागावलेले दिसतात.' आणि पुन्हा गप्पात रममाण झाले. दोन-चार मिनिटं गेली. ते आमदार पुन्हा एकदा उसळले आणि म्हणाले, 'साहेब काय प्रॉब्लेम आहे, अहो सी.एम. साहेब सोडा ना आमच्या मंडळींना ! द्या ऑर्डर ! काय प्रॉब्लेम !!' तरीही बाबासाहेबांचा गप्पांचा फड चालूच होता.



त्यावर तो आमदार पुन्हा म्हणाला 'अहो, सी.एम. साहेब काय अडचण आहे! तुम्ही लिहीत का नाही ऑर्डर !!' त्यावर ताबडतोब त्याच्याकडं बघत म्हणाले, अरे लिहितो मित्रा ! पण कागद हवा. पेन हवं. सगळं व्यवस्थित हवं की नको लिहायला !!' तो आमदार उठला. तो स्वत: दुसऱ्या खोलीत गेला. त्यानं पेन, कागद सारं आणून सी.एम. साहेबांसमोर ठेवलं आणि तो म्हणाला, 'अहो सी.एम. साहेब आता तरी लिहाना. आता काय प्रॉब्लेम आहे का !' तरीही गप्पांचा फड काही संपेना. बाबासाहेब जोरजोरात काही तरी सातारा-सांगलीकडची मजेदार हकीकत सांगत होते. त्यावर तो आमदार म्हणाला, 'अहो सी. एम. साहेब, पुन्हा पुन्हा काय सांगायचं तुम्हाला. अहो आमची माणसं सोडा, काढा लवकर ऑर्डर नाहीतर गोंधळ करू बघा हाऊसमध्ये, आता तुम्हाला कागद दिला, पेन दिलं, तुम्ही लिहीत का नाही ऑर्डर !'

सगळे-जण बघत राहिले. सी. एम. हसतहसत त्या आमदाराला म्हणाले, 'अहो लिहितो आमदार साहेब पण रिलीज या शब्दाचं जरा स्पेलिंग तर आठवू द्या. अहो गेल्या

कित्येक वर्षात स्वत:च्या हातानं कधी लिहिलं नाही हो ! त्या मुळं स्पेलिंग आठवलं की लगेच लिहितो बघा !' या विनोदावर बाकीचे सारे तर हसलेच, पण तो रागावून लाल होत चाललेला आमदारही खूपच मोकळेपणानं हसला आणि खरं तर त्याचा राग सुद्धा शांत झाला असावा.

असंच एकदा नव्हे तर अनेकदा घडायचं आणि बाबासाहेब प्रचंड तणातणीच्या वातावरणावर मात करणारं गंमतीदार विधान करून सबंध वातावरणच निवळून टाकायचे. सारेच नेते हे करतात असं नव्हे. पण पुष्कळ राजकीय नेत्यांच्याकडं असं एक खास वेगळं कसब असतं.

पुण्यात एकेकाळी शनिवारवाडा पटांगणावर जंगी सभा होत. त्या खरोखरीच न भूतो न भविष्यति अशा असत. एक तर सभा या सर्वसाधारण फुकट असतात. त्यांना शुल्क, आकार काही नसतं आणि त्या काळात दूरदर्शन वगैरे सारखी घर बसल्या असणारी करमणूकही नव्हती. त्यामुळं या 'शनिवारवाडा सभांना' उदंड गर्दी होत असे. अशाच एका सभेला महाराष्ट्राचे आणि देशाचे दिवंगत महान नेते श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचं भाषण झालं. त्या काळात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ फारच जोरात होती. त्या सभेत त्या चळवळीचा उल्लेख करून यशवंतरावजी म्हणाले होते, 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही एखाद्या महाभारताच्या प्रसंगासारखी महान चळवळ आहे. त्यात सर्वांनी सहभागी व्हावं. तसेच पक्षाच्या विरोधकांनीही सामील व्हावं. या महाभारतात आचार्य अत्रे हे आम्हाला द्रोणाचार्यांच्या ठिकाणी आहेत. तर श्रीपाद अमृत डांगे यांना आम्ही कृपाचार्य मानतो आणि एस्. एम्. जोशी यांना आम्ही भीष्माचार्य मानतो' जमलेल्या प्रचंड मोठ्या जनसमुदायानं यशवंतरावांच्या या विधानाचं फार मोठ्या टाळ्यांच्या गजरात स्वागत केलं. 'काय भाषण झालं हो !' असं म्हणत प्रेक्षक घरी परतले.

त्याच शनिवार वाड्यावर दुसऱ्याच दिवशी आचार्य अत्रे यांची तशीच टोलेजंग सभा झाली. यशवंतरावजींच्या सभेचा उल्लेख करून आचार्य अत्रे म्हणाले, 'महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री यशवंतरावजी चव्हाण कालच्या सभेत म्हणाले ते आम्हाला द्रोणाचार्य मानतात. आमचे मित्र श्रीपाद अमृत डांगे यांना कृपाचार्य मानतात आणि एस्. एम्. जोशी यांना ते भीष्माचार्य मानतात. हे जरी खरं असलं तरी मग त्यांची अशी समजूत आहे का की आम्ही त्यांना अर्जुन मानू, आम्ही त्यांना भीम मानू, आम्ही त्यांना धर्मराज-युधिष्ठिर मानू. नाही नाही मित्रांनो, आम्ही त्यांना दुर्योधन मानणार, आम्ही त्यांना दु:शासनच मानणार.' आचार्य अत्रे यांच्या मल्लिनाथीवरही पुणेकर प्रेक्षकांनी टाळ्यांचा प्रचंड गजर करून आचार्य अत्रे यांच्या विधानालाही खूप दाद दिली. अशा सभांमधून वक्त्याचा हजरजबाबीपणा वारंवार प्रत्ययाला येई. अर्थात यासाठी वक्त्यांचं वाचन असावं लागतं. बहुश्रुतताही असावी लागते. आज अशा तऱ्हेच्या सभा आणि वक्ते दोन्हीही दुर्मीळ झाल्याचं जाणवतं.

***

# ।। हास्यमाहात्म्य ।।

**डॉ. कौमुदी गोडबोले**

परवाच कोणीतरी माझी ओळख करून घेतली. समोरची व्यक्ती ''नमस्कार'' म्हणून हसली. मनात विचार आला, खरं तर ओळख करून घेण्यात हसण्यासारखं काय आहे? पण आपण हसतो, एवढं मात्र खरं ! टी.व्ही. वर बातम्या सुरू झाल्या की आणि संपल्यावर वृत्तनिवेदिकेचं कृत्रिम का होईना पण स्मित आपल्या परिचयाचं असतं. दुडुदुडु धावणाऱ्या बाळाचं खुदुखुदु हसणं तर आई वडिलांचा आनंदाचा ठेवा असतो. हसूनदेखील भीती, चीड निर्माण करण्याची ताकद छद्‌मी, कुटिल हास्यात असते आणि आपल्याबरोबर इतरांनाही उगाचच हसवण्यात सातमजली हास्याचा मोठा वाटा असतो. परीक्षेत प्रश्नांची उत्तरं आली नाहीत की चेहऱ्यावरचं ओशाळवाणं, कसंनुसं हसणं सगळ्यांनाच ओळखीचं असतं. काहीजण गालातल्या गालात हसतात तर काही मिशीतल्या मिशीत! काहीजणं लांबलचक या कानापासून त्या कानापर्यंत हसतात. कोणीकोणी तर डोळ्यांनी हसतात. पण यावरही ताण म्हणजे एका डोळ्यात आसू आणि एका डोळ्यात हासू अशी अवघड स्थिती होते म्हणे कधीकधी ! पण काहीजणांना मात्र विनोदाचं वावडं असतं. 'टवाळा आवडे विनोद' अशीही ते संभावना करतात आणि वर 'हसतील त्याचे दात दिसतील' अशी केविलवाणी कहाणी सांगतात. तर काही विनोदही बोचरा असल्याची तक्रार करतात. एखाद्याचं चारचौघात हसू होणं किंवा एखादी गोष्ट हास्यास्पद वाटणं हे मात्र चांगलं लक्षण नसतंच !



कोणाचं काहीही मत असो. डॉक्टर म्हणून आमचं मत ठाम आहे. 'हास्यविनोदासारखं रामबाण औषध दुसरं नाही ! Laughter is the best medicine – हसण्याने मनावरचा ताण तर कमी होतोच, पण शरीरातील अंत:स्रावही झटझट बदलून शरीरक्रिया सुसह्य होतात. आपल्या एवढ्याशा मेंदूमध्ये आपण करतो त्या प्रत्येक क्रिया – प्रतिक्रियेचं केंद्र असतं. बरं वाटणं, हसणं, रडणं, रागावणं इतकंच काय तर भूक लागणं आणि भूक भागवणं यासाठीही मेंदूत विशिष्ट जागा असतात. या साऱ्यांच्या परस्पर सामंजस्यामुळेच आपण सुसंगत वागू शकतो. मेंदूच्या काही असाध्य आजारांमुळे ह्या केंद्राचं काम बंद पडलं किंवा चुकीच्या दिशेनं चाललं की मात्र क्रिया प्रतिक्रियांचा पार गोंधळ उडतो. अवेळी हसणं, उगाचच रडणं, खा खा खाणं किंवा खाण्यावरची वासनाच उडणं हे सारं त्यातूनच येतं !

सहसा समाजात लांब चेहऱ्याने वावरणारे, गंभीर विषयांवर चिंतन करणारे


तेच बुद्धिमान असा समज असतो. पण विनोद करणं आणि एखादा विनोद समजून घेणं यालाही बुद्धीची विशिष्ट पातळी लागते. आपण मारे विनोद सांगायचा आणि समोरचा चेहरा मात्र मख्खच ! – मग आपलाच चेहरा बघण्यासारखा होतो की नाही? रडगाणं गाणाऱ्या निराश नायकापेक्षा 'हसते हसते कट जाये रास्ते' असं म्हणणारा किंवा बाकीच्या रडतरावांमधून 'हसता हुआ जो गाएगा' – तोच नायक आपल्याला जास्त आवडतो. हसण्यात खरंच काहीतरी खास असणार ! देवाने माणूस बनवला तेव्हा त्याला जे हसू दिलं ते चराचरात इतर कोणाकडेच नाही! अर्थात काही कवी मंडळींना झाडाफुलांतून उमलणारं निसर्गाचं निर्मळ हसू दिसतं ते वेगळंच

मंडळी, हसणं हे वाटतं तितकं सोपं नाही बरं ! माणूस जन्माला येतो तोच मुळी रडत. पण आजूबाजूची दखल घेऊन हसण्यासाठी बाळाला दोन-तीन महिने लागतात. थोडक्यात रडणं फार सोपं, पण आयुष्य सुखी करायला हसणं कमावणं ही मात्र अवघड पण नक्कीच आवश्यक गोष्ट आहे.

– राहील नं लक्षात !

*चर्चिल यांनी फ्रान्सला भेट दिली तेव्हा पॅरिसला त्यांची जाहीर सभा झाली. या सभेच्या सुरुवातीला फ्रान्सचे पंतप्रधान म्हणाले, ''तुमचं भाषण ऐकण्यासाठी लोकांनी प्रचंड गर्दी केली आहे. यावरून तुम्ही किती लोकप्रिय आहात हे सिद्ध होते.''*

*चर्चिल म्हणाले, ''गर्दीचा आणि लोकप्रियतेचा काही संबंध नाही. आज मला या ठिकाणी फाशी देण्याचा कार्यक्रम असता तर यापेक्षा अधिक गर्दी झाली असती.''*



# असे हे वैज्ञानिक

**गजानन क्षीरसागर**

शास्त्रज्ञ किंवा संशोधक म्हटला की आपल्या डोळ्यांपुढे पिंजारलेले केस, सतत कसल्या तरी प्रश्नांचा विचार करत असल्यासारखा धीर गंभीर चेहरा, अस्ताव्यस्त प्रयोगशाळा, विसराळूपणा, इकडंतिकडं विखुरलेली पुस्तके अशी प्रतिमा निर्माण होत असते. ही माणसं कमी बोलणारी, गंभीर अशीच असणार असाही आपला एक समज असतो. पण वैज्ञानिक मंडळीही तुमच्या आमच्या सारखीच असतात. त्यांनाही गप्पा मारायला आवडतं. हास्य विनोदात भाग घ्यावासा वाटतो, मौज करावीशी वाटते. थोडक्यात सांगायचं तर त्यांच्या संशोधनाच्या विषयांबाबत अथवा प्रयोगाबाबतची गंभीरता, एकाग्रता सोडली तर ही मंडळीही सहजपणे वाट्याला येणाऱ्या जीवनात आनंद घेणारी असतात.

अगदी प्राचीन काळातल्या आर्किमिडीजची गंमत पाहा. गणित आणि भूमिती हे त्याच्या आवडीचे विषय. भूमितीची निरनिराळी प्रमेये सोडविण्यात तो इतका तल्लीन होई की त्याला मग कसलेच भान उरत नसे. जेवणखाण तर सोडाच पण आंघोळीचेही भान आर्किमिडीजला राहत नसे. घरातला नोकरच मग लहान मुलाला भरवतात तसं आर्किमिडीजच्या तोंडात तो इकडं तिकडं फेऱ्या मारत असतानाच घास भरवीत राही. आंघोळीच्या वेळी तर अक्षरश: त्याला उचलून



स्नानगृहात ढकलून द्यावं लागायचं.

एकदा असंच आर्किमिडीजला स्नानगृहात ढकलून नोकरानं बाहेरून दरवाजा लावून घेतला.

तासभर झाला तरी आर्किमिडीज मोरीतून बाहेर आला नाही तेव्हा हा करतोय तरी काय हे पाहावं म्हणून नोकरानं स्नानगृहाचा दरवाजा उघडला तर काय गंमत ! आर्किमिडीज अंगाला लावायच्या उटण्याचा उपयोग करून स्वत:च्या छातीवर भूमितीची एक आकृती

काढून तयार झालेलं प्रमेय सोडविण्यात गर्क झालेला होता आणि आंघोळीसाठी टबात काढून ठेवलेलं गरम पाणी कोमट होऊन गेलेलं होतं !

थॉमस आल्वा एडिसनचं नाव ठाऊक नाही असा सुशिक्षित माणूस शोधूनही सापडणार नाही. अनेक शोध या शास्त्रज्ञाच्या नावावर आहेत. शास्त्रीय माहितीची पुस्तके वाचायची आणि घरात तयार केलेल्या प्रयोगशाळेत निरनिराळे प्रयोग करीत राहायचा त्यांचा छंद होता. या छंदापायी शाळेतल्या इतर विषयांच्या अभ्यासाचा त्यांना खूप कंटाळा यायचा. नावडत्या विषयांच्या अभ्यासाची कटकट नको म्हणून एडिसननी अर्धवट शाळा सोडून दिलेली होती. तारायंत्र, टेलिफोन, ग्रामोफोन, मुका चित्रपट, बोलका चित्रपट, विजेचा दिवा, विजेवर चालणारी आगगाडी असे लहान मोठे सुमारे १३०० शोध त्यांच्या नावावर आहेत, हे आणखी एक नवल.

एडिसन यांच्या नावावर काही विनोदी किस्से मोठ्या आवडीनं सांगितले जातात.

इन्कमटॅक्स भरण्यासाठी एडिसन गेले. तेव्हा तिथं आठदहा जण रांगेत उभे होते. एडिसनही रांगेत उभे राहिले. थोड्याच वेळात त्यांच्या मागे आणखी पाच पंचवीस माणसं येऊन उभी राहिली. एडिसनचा नंबर आला आणि अधिकाऱ्यानं त्यांना नाव विचारलं. गंमत अशी की खूप वेळ त्यांना आपलं नावच आठवेना. मागची माणसं चुळबूळ करू लागली. तेव्हा अधिकारी चिडून म्हणाला,

''मिस्टर स्वत:चं नाव विसरता म्हणजे कमालच आहे !''

''हो ना !'' एडिसन पुटपुटले, ''मलाही तसंच वाटतंय, जरा थांबा मी आठवून बघतो. जरा वेळानं मला ते नक्कीच आठवेल.''

त्या रांगेत उभ्या असलेल्या माणसांपैकी एक जण एडिसनना ओळखत होता. तो चटकन् पुढे आला आणि अधिकाऱ्याला म्हणाला,

''मला यांचं नाव ठाऊक आहे. आमच्या घराजवळच हे राहतात. यांचं नाव थॉमस आल्वा एडिसन.''

''काय?'' तो अधिकारी अचंब्याने म्हणाला, ''म्हणजे थोर संशोधक एडिसन ते हेच?''

एडिसन शांतपणे म्हणाले, ''या गृहस्थांना माझं नाव वेळेवर आठवलं म्हणून बरं झालं. नाहीतर माझ्या मागे उभ्या असलेल्या मंडळींना निष्कारण ताटकळावं लागलं असतं. मला वाटतं यांनी बरोबर नाव सांगितलेलं आहे !

एडिसन यांचा आणखी एक विनोदी किस्सा खूपच प्रसिद्ध आहे.

ग्रामोफोनचा शोध लावल्यामुळे एडिसनचं नाव अगदी सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचलेलं होतं. पहिली ग्रामोफोनची प्रायोगिक तबकडी जी तयार झाली ती एडिसनच्या आवाजाचीच होती. या तबकडीवर त्यांनी एक बालगीत स्वत:च्याच आवाजात ध्वनिमुद्रित केलेलं होतं. 'मेरी हॅड ए लिटल लॅम्ब' हे ते बालगीत. जगातल्या पहिल्या ध्वनिमुद्रणाचा मान या गीताला त्यामुळं मिळाला. ग्रामोफोनच्या शोधामुळं एडिसनचं नाव अगदी घराघरात जाऊन पोहोचलं होतं. अशाच एका मेजवानीला

एडिसनला आवर्जून बोलावण्यात आलं उपस्थितांशी एडिसनचा परिचय करून देण्यात आला. या परिचयात एडिसननं 'बोलणारं यंत्र' शोधलं असल्याचा वारंवार उल्लेख करण्यात येत होता. एडिसननं सगळं भाषण शांतपणे ऐकून घेतलं आणि भाषणाला उत्तर देण्यासाठी तो उभा राहिला. त्याबरोबर टाळ्यांचा कडकडाट झाला. शांतता प्रस्थापित झाल्यावर एडिसननं बोलायला सुरुवात केली.




''मित्रहो, आता झालेलं माझ्या परिचयाचं भाषण मी लक्षपूर्वक ऐकलं. भाषण तसं चांगलंच झालं. पण त्यातील एक चूक प्रथम मला तुमच्या लक्षात आणून दिली पाहिजे. ती म्हणजे बोलणारं यंत्र मी शोधून काढलं नसून ते परमेश्वरानं फार फार पूर्वीच शोधून काढलेलं आहे. मी फक्त आपल्याला हवं असेल तेव्हा बोलणं बंद करता येणारं यंत्र मात्र शोधून काढलेलं आहे.''

श्रोत्यांमध्ये एकदम हास्याची लाट उसळली आणि ती सभा एडिसननं आपल्या नर्म विनोदी भाषणानं जिंकली.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांच्या विषयीचे काही किस्से तर खूप मजेशीर आहेत. अमेरिकेतल्या प्रिन्स्टन विद्यापीठाच्या



डीनच्या घरी आईनस्टाईन येणार होते तेव्हाची गोष्ट. एवढा मोठा शास्त्रज्ञ येणार म्हटल्यावर त्यांना भेटण्याची उत्सुकता अनेकांना होती. त्यामुळे डीनसाहेबांच्या घरचा फोन सारखा आईनस्टाईनची चौकशी करण्यासाठी घणघणत राहिला. डीनसाहेबांच्या कुटुंबातील मंडळी अगदी कावून गेली. तेवढ्यात आणखी एक फोन आला आणि तो डीन साहेबांच्या मुलानेच घेतला.

''आल्बर्ट आईनस्टाईन आपल्याकडे येणार होते ना?''

''होय !'' ''त्यांची उतरण्याची व्यवस्था कुठं केली आहे ते सांगू शकाल का?''

''बिलकुल सांगणार नाही.''

मुलगा तिरसट स्वरात म्हणाला.

''का बरे?'' पलीकडून आवाज आला.

''अहो, त्यांचा पत्ता सांगितला तर होणाऱ्या गर्दीला आम्ही कसं तोंड देणार?'' असं म्हणून तो फोन खाली ठेवणार तेवढ्यात पलीकडून शांत स्वरात विचारणा झाली.

''ते खरं आहे. तुम्ही याबाबत कुणालाच

काही सांगू नका. पण मला तरी सांगाल की नाही?''

''आपण कोण?''

''मी खुद्द आईनस्टाईनच बोलतोय''

एवढं संभाषण झाल्यावर पुढं काय घडलं असेल याची कल्पना तुम्हीच करा.

हे झाले परदेशी शास्त्रज्ञांचे किस्से. आपल्या जयंत नारळीकरांचेही किस्से खूप प्रसिद्ध आहेत. त्यातला एक असा–

जयंतरावांचे आईवडील लंडनहून भारतात येण्यास निघाले. सर्व सामानसुमान काळजीपूर्वक तपासून बरोबर घेऊनही शेवटीं व्हायचं तेच झालं. विमानतळावर आईची छत्री विसरली. विमान सुटलं आणि आईची छत्री राहिल्याचं जयंतरावांच्या लक्षात आलं. त्यांनी ती छत्री ताब्यात घेतली आणि ताबडतोब आईला तार केली.

''काळजी नसावी. माँसाहेबांच्या छत्रीसह छत्रपती जयंत सुखरूपपणे घरी पोहोचलेले आहेत!''

जयंतरावांचाच आणखी एक किस्सा ! पण हा आहे त्यांच्या लहानपणातला. जयंतराव अतिशय शांत स्वभावाचे पण हजरजबाबी म्हणून प्रसिद्ध आहेत. अगदी बालवयातच त्यांच्या या स्वभावाची चुणूक दिसून आलेली होती. जयंतरावांचा संस्कृतचा अभ्यास अतिशय चांगला होता. त्यांची आई त्यांना निरनिराळे श्लोक शिकवीत असे. सगळ्या देवांना केलेला नमस्कार शेवटी केशवाला पोहोचतो अशा अर्थाचा एक श्लोक आईने त्यांना शिकवला आणि त्यानंतर काहीतरी




प्रसंग घडून आई त्यांच्यावर खूप रागावली. आपला शांतपणा अजिबात ढळू न देता लहानगे जयंतराव उद्‌गारले, ''आई, तुझा राग पण केशवाकडेच पोहोचतो बरं का!''

विज्ञान विषयावरची व्याख्यानं म्हणजे त्यांना श्रोते मिळणं कठीण आणि मिळालेच तर त्यातले बरेच जण व्याख्यानाच्या शेवटपर्यंत हजर राहणं कठीण! जयंतरावांना या गोष्टीची जाणीव होती. म्हणूनच ते व्याख्यानाच्या अधे–मधे विनोदाची पेरणी करतात. श्रोत्यांना एका जागी स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करतात. एका व्याख्यानाच्या शेवटी श्रोत्यांचे आभार मानताना म्हणूनच जयंत नारळीकरांनी म्हटलं,

''विश्वातील सर्व तारकासमूह व्याख्यानाच्या या एक तासाच्या वेळात पृथ्वीपासून हजारो मैल दूर गेले असतील, पण आपण सर्वजण मात्र एकाच जागी स्थिर राहिलात या बद्दल मन:पूर्वक आभार.''

***

# विनोदी सुभाषिते

**डॉ. श्रीकांत बहुलकर**

संस्कृत साहित्यशास्त्रानुसार ललित वाङ्मयामध्ये एकूण नऊ रस असतात. मध्ययुगीन वाङ्मयात भक्ती हाही एक रस मानलेला आहे. यांपैकी एक हास्यरस आहे. शृंगार, वीर, करुण अशा रसांनी युक्त अशा वाङ्मयाची संस्कृतात रेलचेल आहे. त्यामानानं हास्याला स्थान कमीच. संस्कृत वाङ्मयातला विनोदही फार श्रेष्ठ दर्जाचा नाही. बरेच वेळा तो उपहास, विडंबन या स्वरूपाचा असतो. लोकांना खळखळून हसवायला लावील, असा विनोद तुरळकच आढळतो.

सुभाषिते हा संस्कृत वाङ्मयातला विशेष प्रकार आहे. सामान्यत: उपदेशप्रधान अशा या रचना असतात. तथापि विनोदी सुभाषितेही आपल्याला सुभाषितांच्या संग्रहामध्ये आढळतात. 'सुभाषित रत्नभांडार' नावाच्या एका सुभाषितसंग्रहामध्ये 'हास्यरसनिर्देश:' या प्रकरणात एकूण ५६ सुभाषिते एकत्र केलेली आहेत. त्यामधील व इतरत्र सापडणाऱ्या काही सुभाषितांचा परिचय इथे करून देत आहे.

**कमले कमला शेते हर: शेते हिमालये ।**
**क्षीराब्धौ च हरि: शेते मन्ये मत्कुणशङ्कया ।।**

अर्थ :- लक्ष्मीचा निवास कमळात असतो. शंकर हिमालयात राहतो. विष्णू तर क्षीरसागरात झोपतो (कारण काय तर) मला वाटते, ढेकणाच्या धास्तीने (झोप येत नाही)

चतुर : **सखि मे भर्ता स यल्लिखति तत्परो न वाचयति ।**
**तस्मादप्यधिको मे स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति ।।**



अर्थ :- (एक स्त्री आपल्या मैत्रिणीला म्हणते), ''माझा नवरा बाई इतका हुशार की तो जे लिहितो ते दुसऱ्याला वाचता येत नाही.'' (त्यावर दुसरी म्हणते), ''माझा नवरा तर त्याच्याहून जास्त. त्याला तर स्वत: लिहिलेलं स्वत:लाच वाचता येत नाही.''

**राजस्त्वंत्कीर्तिचन्द्रेण तिथय: पूर्णिमा: कृता: ।**
**मद्गेहान्न बहिर्याति तिथिरेकादशी भयात् ।।**

अर्थ:- (एक दरिद्री कवी म्हणतो) ''राजा, तुझ्या कीर्तीरूप चंद्राने सर्व तिथी पौर्णिमा केल्या आहेत. (त्यामुळे) घाबरून जाऊन एकादशी माझ्या घरामधून बाहेर पडत नाही. (याचा आशय असा - पूर्ण चंद्र आकाशात फक्त पौर्णिमेला दिसतो. पण राजाचा कीर्तीचंद्र अक्षय असल्यामुळे सर्व तिथी पूर्णिमा वाटतात. राजाची कीर्ती सगळीकडे पसरली असली तरी या दरिद्री पंडिताकडे मात्र रोजचीच एकादशी- उपासमार-असते.)

**अत्तुं वाञ्छति वाहनं गणपतेराखुं क्षुधार्त: फणी**
**तं च कौञ्चपते: शिखी च गिरिजासिंहोऽपि नागाननम् ।**
**गौरी जह्नु सुतामसूयति कलानाथं कपालानलो**
**निर्विण्ण: स पपौ कुटुम्बकलहादीशोऽपि हालाहलम् ।।**

अर्थ:- (शंकराच्या गळयातल्या) नागाला

भुकेने कासावीस झाल्यामुळे गणपतीचे वाहन असलेल्या उंदराला मटकावण्याची इच्छा झाली. कार्तिकेयाचे वाहन मोर त्या नागाचे तोंड पकडू पाहतो. पार्वतीचे वाहन सिंहही नागाचे तोंड पकडू पाहतो. पार्वती गंगेचा मत्सर करते तर शंकराच्या कपाळावरचा (तिसऱ्या डोळ्यातला) अग्नी शंकराच्या जटेवरच्या चंद्राचा द्वेष करतो. ह्या कुटुंबकलहामुळे वैतागून शंकराने शेवटी हालाहल प्राशन केले.

(कवी इथेच थांबला आहे. पण पुढे असे म्हणता येईल की 'हाय, विष पिऊनही त्याला मरण आले नाही, जितेपणी मरणाच्या यातना मात्र जास्तच भोगाव्या लागल्या.' हल्लीच्या काळात निदान त्याला आत्महत्येचा प्रयत्न केल्याबद्दल शिक्षा होऊन काही काळ तरी त्या कुटुंबकलहातून सुटका झाली असती.)

कालिदास, भवभूती, बाणभट्ट अशा कवींच्या रचनांचे अनुकरण करण्याच्या हव्यासापायी संस्कृत साहित्याला एक प्रकारचा साचेबंदपणा येत गेला आणि जीवनात त्या अनुभवांचे विनोदात पर्यवसान करण्याची परंपराच वाढली नाही. शूद्रक, क्षेमेंद्र इत्यादी प्राचीन व मध्ययुगीन कवी हे अपवादमात्र. इसवीसनाच्या सतराव्या शतकातल्या नीलकंठ दीक्षितांचे 'कलिविडम्बन' हे काव्य मात्र विनोदी सुभाषितांची परंपरा पुढे चालवते. शिक्षक, वैद्य ज्योतिषी अशा विविध व्यक्तींचे विडंबन करणारे त्यांचे श्लोक प्रसिद्ध आहेत. अठराव्या शतकातल्या वांछेश्वर नावाच्या कवीने रेड्याची स्तुती करणारे महिषशतक रचले. राजाकडून अपमानित झालेल्या वांछेश्वराने रेडा विकत घेऊन शेती करायला सुरुवात केली आणि त्याला साक्षात्कार झाला की राजापेक्षा रेडाच श्रेष्ठ (संस्कृतमध्ये 'महिषी' याचा अर्थ म्हैस आणि पट्टराणी असे होतात. 'महिष' याचा अर्थ फक्त 'रेडा' एवढाच आहे.) वांछेश्वराने आपल्या उपहासपूर्ण शैलीत तत्कालीन सामाजिक स्थितीचे दर्शन घडविले आहे. आधुनिक काळात तर पन्नास-साठ वर्षात अनेक विडंबनकाव्ये निर्माण झाली आहेत. मेघदूताचे विडंबन करणारी 'काकदूत' 'बल्लवदूत' यासारखी दूतकाव्ये त्या कांद्यावरचे 'पलांडुशतक' केरसुणीवरचे 'संमार्जनशतक' प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांच्या 'कण्टकाञ्जलि' मधील उपहासपूर्ण श्लोक त्यांचे मराठी-इंग्रजी उत्कृष्ट भाषांतर आणि जोडीला व्यंगचित्रे असा त्रिवेणी संगम तर इतरत्र कोठेच आढळणार नाही. संस्कृत साहित्याचा हा विशेष हसण्यावारी नेण्याजोगा निश्चितच नाही.

***

*''अमेरिकेने एक संगणक असा बनविला की जणू दुसरा मानवच.''*

*''ते कसे काय?''*

*''तो आपण केलेल्या चुका दुसऱ्या संगणकावर ढकलून देतो.''*

# विनोदातील आमची प्रतिमा



मित्रांनो,

कुमार वयामध्ये वेगवेगळ्या विषयात आपण विहार करत असतो. विनोद हा विषय आपल्या सगळ्यांचा सर्वात आवडता त्याचा विशेषांक निघत असताना प्रबोधकांचाही त्यात काहीना काही निश्चितच सहभाग असला पाहिजे. या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या प्रबोधकांच्या प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास आमच्यापर्यंत पोहोचावा या हेतूने छात्र प्रबोधनच्या वर्ष ३, अंक १० मध्ये विनोद विशेषांकानिमित्त एक स्पर्धा जाहीर केली होती.

## विनोद स्पर्धा निर्णय

| | व्यंगचित्र स्पर्धा | निबंध स्पर्धा |
|---|---|---|
| **प्रथम** : | स्वाती पेकम, घाटकोपर, मुंबई. | नमिता मोघे, औरंगाबाद |
| **द्वितीय** : | कांचन बेलपाठक, देवपूर-धुळे | प्रिया राणे, धुळे. |
| **तृतीय** : | भूषण शहा, लातूर. | **(या स्पर्धेचे दोनच क्रमांक दिले आहेत.)** |
| **उत्तेजनार्थ** : | अभिजित धोत्रे, पुणे. | |

| | विनोद स्पर्धा | कथा-प्रसंग स्पर्धा |
|---|---|---|
| **प्रथम** : | प्रशांत गायकवाड, सांगली. | शाल्मली बंगाली, चाळीसगांव |
| **द्वितीय** : | नरेंद्र रानडे, सांगली. | **(या स्पर्धेचा एकच क्रमांक काढला आहे.)** |
| **तृतीय** : | अमोल वाघ, औरंगाबाद. | |

**या स्पर्धेसाठी सौ. चारूता पुराणिक, सौ. अनुराधा धुपकर आणि श्री. दत्ता श्री. टोळ यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. पारितोषिकविजेत्या स्पर्धकांचे मन:पूर्वक अभिनंदन !**


## रांग

रामपूरचे राजा जसवंतसिंह यांनी आपल्या राज्यात रांगेची पद्धत सुरू केली. एक मनुष्य तांदूळ आणण्यास गेला तेव्हा त्यास मोठी रांग दिसली. १ तास रांगेत उभे राहूनही त्याला तांदूळ मिळाले नाहीत. त्यामुळे तो वैतागला. दुसऱ्या दुकानातही मोठी रांग. तो राजावर चिडला. तो दुकानातून चाकू आणण्यास गेला. तिथेही मोठी रांग. शेवटी त्याला चाकू मिळाला व तो राजाला मारण्यास राजवाड्याकडे धावला. तिथे पाहतो तर राजाला मारण्यासाठी हातात चाकू घेऊन लोकांची लांबच लांब रांग.

**प्रशांत गायकवाड, सांगली.**




स्वाती पेकम



कांचन बेलपाठक



सर्व सभासदांना हसण्यासाठी शुभेच्छा !


# विनोदी प्रसंग

आपणा सर्वांना विनोदी प्रसंग ऐकायला खूप मजा येते नाही? प्रत्येकाच्या जीवनात विनोदी प्रसंग घडतातच. मलासुद्धा एक विनोदी प्रसंग पाहावयास मिळाला.

एकदा मी व माझे वडील भाजी-बाजारात भाजी घेण्यासाठी गेलो. आमचं गाव खेडं असल्याने तेथे भाजीवाले खालीच बसतात. त्यामुळे खाली वाकून भाजी निवडावी लागते. आम्ही भाजी घेत असताना बाजूलाच असलेल्या भाजीवालीकडे एक गृहस्थ भाजी घेण्यासाठी आले. ते गृहस्थ खाली वाकून भाजी निवडत होते, माझे लक्ष त्यांच्याकडे गेले.

दोन पायांमध्ये अंतर ठेवून ते खाली वाकून भाजी घेत होते. असे पाहून का कोण जाणे मला एकदम हसू आहे.

बाजारात मोकाट गायींचा सुळसुळाट असतो. नेमकी एक गाय नेमक्या त्याच भाजीवाल्याकडे आली. त्या गृहस्थांच्या पायामधून तोंड घालून भाजी ओढू लागली. त्या भाजीवालीने गायीवर काठी उगारली. घाबरून त्या गायीने एकदम मान वर उचलली.



गायीने मान उचलल्या बरोबर ते गृहस्थ तिच्या मानेवर अलगद विराजमान झाले. गाय घाबरून पळत सुटली.

त्या गृहस्थांच्या प्रचंड वजनामुळे गायीला मानही नीट वर करता येईना. त्या गृहस्थांचे पाय तर जमिनीला टेकलेले,



पण चाल मात्र गायीची. बाजारात एकच गोंधळ उडाला. भेदरून गेलेली गाय वेडी-वाकडी पळत होती. त्यामुळे त्या अगडबंब गृहस्थांचा तोल जात होता. त्यामुळे त्यांनी शिंगांना धरून ठेवले होते.

लोकांच्या ओरडण्याने गाय आणखीच भेदरली आणि जोरात धावू लागली. गाय थांबेना त्यामुळे त्या गृहस्थांना काय करावे ते सुचेना; तेव्हा मला शंकर पाटील यांची 'धिंड' ही कथा आठवली.

एवढा उंचापुरा माणूस पण हतबल झाल्यासारखा दिसत होता. या पेचप्रसंगातून सुटका कशी व्हावी याची चिंता त्या गृहस्थांनाच नाही तर बाजारातल्या सर्व लोकांना पडली होती. तेवढ्यात मेथीच्या भाजीच्या ढिगावर त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि एकदाची त्यांची त्या वरातीतून सुटका झाली आणि मानेवरचे ओझे उतरल्याने गायीलाही हायसे वाटले असावे. किती तरी वेळ ते गृहस्थ भाजीवरच बसून राहिले होते.

अजूनही बाजारात गेले की मला या प्रसंगाची तीव्रतेने आठवण होते आणि हसू येते. पुन्हा सर्व प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो. मी आपल्या मनाशीच थोडी हसते व पुढे निघते.

**शाल्मली बंगाली, चाळीसगाव**

**'छात्र प्रबोधन' मासिकासाठी जाहिराती मिळवून द्या. दर - अर्धे पान रु. ९००/- पूर्ण पान रु. १,५००/-**

# आम्ही कोण ?

आम्ही कोण म्हणूनि काय पुससी ? आम्ही असू लाडके
देवाचे, दिधले असे जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वी या प्रतिभाबले विचरतों चोहीकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

सारेही बडिवार येथील पहा! आम्हांपुढे ते फिके;
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;
फोले पाखडिता तुम्ही, निवडितो ते सत्त्व आम्ही निके!

शून्यामाजि वसाहती कोणी सुरांच्या बरे?
पृथ्वीला सूरलोकसाम्य आणावया कोण ते?
ते आम्हीच सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य मंगल तुम्हा ज्यापासुनी लाभते!

आम्हाला वगळा – गतप्रभ झणी होतील तारांगणे;
आम्हाला वगळा – विकेल कवडीमोलावरी हे जिणे!

**केशवसुत**

आम्ही 'कोण' म्हणून काय पुसता दाताड वेंगाडूनी?
'फोटो' मासिक पुस्तकांत न तुम्ही का आमुचा पाहिला?
किंवा 'गुच्छ' 'तरंग' 'अंजलि' कसा अद्यापि ना वाचिला?
चाले ज्यावरती अखंड स्तुतिचा वर्षाव पत्रांतुनी?

ते आम्ही परवाङ्मयातील करू चोरून भाषांतरे,
ते आम्ही–न कुणास देऊ अगदी याचा सुगावा परी!
डोळ्यांदेखत घालुनी दरवडा आम्ही कुबेराघरी!
त्याचें वाग्धन वापरून लपवू हीं आमुची लक्तरे!

काव्याची भरगच्च घेऊनि सहा काखोटिला पोतडी,
दावूं गाउनि आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामध्ये,
दोस्तांचे घट बैसवून करूं या आम्ही तयांचा 'उदे'
दुष्मनावर एकजात तुटुनी कीं लोंबवू चामडी।

आम्हाला वगळा – गतप्रभ झणीं होतील साप्ताहिके!
आम्हाला वगळा – खलास सगळी होतील ना मासिके!

**केशवकुमार**

## विडंबन आम्ही कोण ?


विनोदाची तरलता आणि भावतरलतेची विनोदी बाजू योग्य संदर्भात पाहण्याची बुद्धी विडंबनकार व त्याचा वाचक दोघांकडेही असावी लागते. कवि केशवसुतांची 'आम्ही कोण ?' व तिचे आचार्य अत्रे यांनी केलेले विडंबन दोन्ही सोबत देत आहोत.

# सुदाम्याचे पोहे

मराठी विनोदी साहित्यिकांच्या अग्रभागी ज्यांची गणना करायची, त्यातील सर्वमान्य नावांपैकी एक नाव म्हणजे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. त्यांच्या 'सुदाम्याचे पोहे' या विनोदी ललित लेखांच्या पुस्तकाने सुमारे शंभर वर्षे रसिकांचे निखळ रंजन केले आहे. वाचकांच्या हृदयसिंहासनावर दीर्घकाळ अधिराज्य करणाऱ्या पुस्तकांच्या यादीत 'सुदाम्याचे पोहे' हे पुस्तक बऱ्याच वरच्या क्रमांकावर आहे. या पुस्तकाच्या लेखनाने मराठी साहित्यात आगळी विनोदी लेखन पद्धती सुरू झाली हे निर्विवाद मान्य व्हावे.

निर्विष विनोद कसा असावा, याचे आदर्श उदाहरण म्हणजे प्रस्तुत पुस्तक. लेखकाने प्रस्तुत पुस्तकास साहित्य बत्तिशी असे आणखी एक नामाभिधान दिले आहे. गाजलेल्या 'सिंहासन बत्तिशी' ची टोपी सहज उडवायची एवढाच माफक हेतू हे पर्यायी नाव नमूद करण्यामागे असावा. पुस्तकात एकूण बत्तीस लेख आहेत.

विषयात नावीन्य नाही मात्र त्यांची मांडणी नावीन्यपूर्ण आहे असे पुस्तक वाचल्यानंतर आपल्याला लक्षात येते. विनोदी लेख लिहिताना लेखकाने व्यंगोक्ती, अतिशयोक्तीचा अवलंब केला आहे. त्यामुळे रसिकांचे निर्भेळ रंजन होते. क्वचित प्रसंगी लेखास उद्बोधनाची किनार असल्याचे दिसून येते. लेखनात काही वेळा कृत्रिमता आढळते. कृत्रिमता लेखन-हेतूमध्ये आहे. विनोदाच्या स्वरूपात नाही.



मानवी जीवन विसंगतीने भरलेले आहे. विसंगती, अतिशयोक्ती, उपहास अन् उपरोध ही विनोदी लेखनाची अंगे. सरस गद्य-पद्य लिखाणापेक्षा विनोदी लेखन अतिशय अवघड.
मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनात सतत नावीन्यपूर्ण काय घडणार? त्याचे अनुभव अत्यंत मर्यादित. मर्यादित अनुभवाच्या शिदोरीच्या आधारे लेखकाने सामान्य माणसाच्या आयुष्यात येऊ शकणाऱ्या अनुभवांवर प्रच्छन्न टीका केली आहे.

गेली अनेक वर्षे प्रत्येक गटाचे, भिन्न वाङ्मयप्रवाहांच्या लेखकांचे संमेलन भरवले जात आहे. उदंड जाहली संमेलने असे म्हणण्याची वेळ येऊन ठेपली तेव्हा लेखकाने रूपकाच्या माध्यमातून 'चोरांचे संमेलन' या लेखास जन्म दिला. हास्यास्पद कल्पनेचे हास्योत्पादक तऱ्हेने केलेल्या गुणदोषांच्या विवेचनातून 'चित्रगुप्ताचा जमाखर्च' हा निबंध साकार झाला आहे.

'चोरांचे संमेलन' निबंधातील 'मी नुसते आपले अंगच चोरावे' 'स्वत:च्याच पैशाची चोरी करू लागलो.' 'अर्थशास्त्राचा मोठा

सिद्धांत आहे की देशाची भरभराट होण्यास त्यातील संपत्ती देशातील देशात फिरत राहिली पाहिजे.' अशी चमकदार वाक्ये कल्पकतेची, त्यांच्याकडे शब्द संपत्तीचा मोठा खजिना असल्याची साक्ष देतात.

चोरीच्या हत्यारांचे संमेलनात प्रदर्शन भरवणे, दारू पिऊन चोरी केल्यास पुष्कळदा अपयश येते. सबब मद्यपानाच्या निषेधाचा ठराव मांडणे. इ. अनेक गोष्टी लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती व बहुश्रुतता याची साक्ष पटवतात. उठसूट संमेलने भरवून त्याला 'अखिल भारतीय...संमेलन' असे नाव देणे हास्यास्पद असल्याचे व या प्रवृत्तीची खिल्ली उडवण्यासाठी हा लेख लिहिला आहे. लेखकाच्या प्रस्तुत लेखास फार मोठा काळ लोटला. आता तर, विभागीय, उपनगरीय अशी छोटी-छोटी संमेलने भरविण्यात येऊ लागली आहेत. त्या पार्श्वभूमीवर सदर लेखाची महत्ता, लेखकाचा द्रष्टेपणा प्रत्ययास येतो.

Sence of human असल्यानंतरच



-''मैलाचा दगड अजून आला नाही.''
-''त्याला जागचं हालताच येत नाही.''

Sence of humour असतो असे म्हणतात याची 'पांडूतात्याची निर्जळी एकादशी' हा लेख वाचून साक्ष पटते.

'चित्रगुप्ताचा जमाखर्च' लेखात एखाद्या संस्थेचा चिटणीस अथवा पदाधिकारी होऊन पैसे खाणे, धर्मादाय संस्थेसाठी पैसे जमवताना दुष्ट हेतू मनात बाळगणे ह्या मानवी मनातील अपप्रवृत्तीवर लेखकाने कोरडे ओढले आहेत.

'शिमगा' लेखात लेखक या सणामागे ऐतिहासिक, तात्त्विक आरोग्यविषयक व नीतिविषयक असे चार हेतू मानतात. त्या हेतूने लेखकाने केलेले लेखन समर्थनीय ठरते. ह्याबद्दलचे विवेचन योग्य तऱ्हेने लेखात केले आहे.

वाचकांनी असे हे वाचनीय पुस्तक अवश्य गृहग्रंथालयात ठेवावे.

***

***तिकिट तपासनीस (उतारूस) :*** तुझं तिकिट दाखव.

***उतारू :*** पैसे घरीच विसरलो म्हणून तिकिट नाही काढले.

***ति. त. :*** बरे, कुठे जायचंय तुला?

***उतारू :*** जिथं रामाचा जन्म झाला तिथे.

***ति. त. :*** प्रथम तू जिथं कृष्णाचा जन्म झाला तिथं जा.

असे म्हणून त्याने त्या उतारूला रेल्वे पोलिसाकडे पाठविले.

***डॉक्टर :*** (रुग्णास) तुमचा रोग आनुवंशिक दिसतो.

***रुग्ण :*** असं? मग माझं बिल माझ्या आजोबांकडे पाठवा.

# लहान विनोदातून महान विनोद शोधणारे मधुकर टिल्लू

**डॉ. श्रीकांत बहुलकर**

चांगलं विनोदी बोलणं अनेकांना जमत नाही. वक्तृत्वकला अंगी असली तर अभ्यासपूर्ण, पांडित्याचे प्रदर्शन करणारे भाषण करता येईल. पण परिणामकारक, निर्विष विनोदाने भरलेले भाषण? बरंच अवघड. सोपे तर निश्चित नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे सर्व कलांना प्रशिक्षण आहे. मात्र विनोदी भाषण करण्याबाबत अद्याप कोणी कार्यशाळा सुरू केल्याचे माझ्या वाचनात नाही.

आपल्याला कोणी विनोदी किस्सा सांगितला तर आपण संधी मिळताच तिचा आपल्या बोलण्यात उपयोग करतो. पुढे ऐकणारा दुसऱ्याने तिसऱ्याला अशा पद्धतीत ही साखळी वाढते. शृंखलेतील सात-आठ क्रमांकाच्या श्रोत्याला तो विनोद परिणामकारक तऱ्हेने सांगता येतोच असे नाही. त्यामुळे त्याच्या निवेदनांवर कुणी हसत नाही. अन् विनोदी बोलू इच्छिणाऱ्या वक्त्याची तिथेच वक्ता म्हणून अखेरही होते.

विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन विनोदी निबंध लिहायला सांगतात. त्या प्रकारे विनोदी भाषण करायला सांगावे. मुलाच्या प्रतिभाशक्तीला, कल्पनाशक्तीला वाव मिळतो. एखाद्या विशिष्ट दिशेने चालायला सांगितलं, शिकवलं तर मूल ते चटकन ग्रहण करत. त्याची विनोदीबुद्धी वाढीस लागते. छोट्या छोट्या प्रसंगात असे विनोद मूल शोधायला लागते. तशी सवय लागली की त्याच्या अंगी हजरजबाबीपणा-देखील येतो. महत्त्वाची



गोष्ट अशी की मुलाच्या अंगी असलेला भांडकुदळपणा निश्चितच कमी होतो. छोट्या छोट्या प्रसंगातून विनोद शोधणे किंवा तणावपूर्ण वातावरणाच्या वेळी आवश्यकतेनुसार विनोदाचा शिडकावा करून तापलेले वातावरण थंड करण्याकडे ओढा वाढतो. उदाहरणाने सांगणे झाल्यास एकदा कुठल्यातरी टेस्ट मॅचच्या वेळी विख्यात बॅट्समन सुनिल गावसकर केवळ प्रेक्षक म्हणून आले होते. मध्यंतरात वहीवर स्वाक्षरी घेण्यासाठी त्यांच्या भोवती मुले गोळा झाली. अनेकांना सह्या देऊन झाल्यानंतर माझ्या मुलाचा नंबर आला. नेमकं त्या वेळी संयोजकांपैकी कुणी गावसकरांना समारंभस्थळी बोलवायला आले. विनोदी प्रवृत्तीवर भरणपोषण झालेला माझा अकरा-बारा वर्षाचा मुलगा त्यांना म्हणाला, ''मला सही दिल्याशिवाय जाणे तुम्हाला अडचणीचे होईल.''

''ते का? तू माझ्या नातेवाईकाचा, मित्राचा मुलगा आहेस का?'' गावसकरांनी प्रश्न केला.

माझा मुलगा म्हणाला, ''छे ! मी मोठा होणार आहे. तेव्हा माझी सही घ्यायला तुमचा मुलगा आला अन् मी नाही म्हटलं तर कसं होईल?'' माझ्या मुलाच्या ह्या बिनतोड युक्तीवादानंतर गावसकरांनी त्याला हसत

स्वाक्षरी दिली हे सांगायला नको.

माणसाच्या अंगी विनोदी प्रवृत्ती असल्यास जीवनातील कठीण प्रसंग, अडचणी सुसह्य होतात व दुःख सोसण्याची सहनशक्ती अंगी येते.

मी काही वर्षे ससून हॉस्पिटलमध्ये तर काही काळ मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून काम केले. महाराष्ट्रभर भ्रमंती केली. लॉजवर, अगर जमेल तिथे मुक्काम केला. त्यामुळे अनेक माणसे मला भेटली. त्यांच्या समवेत मैफल रंगवताना मी रंगून जात असे. प्रल्हादाला जळी, स्थळी, काष्ठी देव दिसायचा पण मला विनोद दिसतो. कुणाला गुरू न करता, एकपात्री प्रयोग पाहिलेला नसताना मी स्वयंप्रेरणेने एकपात्री कार्यक्रमसुद्धा केला. कलावंतांना प्रांत, पंथ याची अडचण नसते. अंगी गुण असल्यास केव्हाही, कुठेही वाव मिळतो. मात्र पुणे-मुंबईच्या कलावंताला प्रसारमाध्यमे सुलभ असल्याने तुलनेने इतरांपेक्षा प्रसिद्धी अधिक मिळते, प्रतिष्ठा लाभते.

प्रत्येक व्यक्तीचे जीवन ही एक कादंबरी आहे. तेव्हा कुणालाही कमी लेखू नये. उलट व्यक्तीची वैशिष्ट्ये, कुणाचा एखादा उद्‌गार याचा मार्जारप्रवृत्तीने शोध घेऊन विनोदाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न मांडता येतात. आपल्या भाषणातून त्यावर टिका टिप्पणी करता येते. याबद्दलचे उदाहरण म्हणजे गप्पांच्या ओघात एका माणसाचे 'आमचे खेड्याचे गाव आहे' ह्या उद्‌गाराच्या आधारे मी नदीच्या काठी वसलेल्या एका काल्पनिक खेड्याची कहाणी तयार केली. त्या खेड्यातील कुणीही व्यक्ती बेकार नव्हती. कारण प्रत्येकजण नदीकाठच्या वाळूतून धान्यात मिसळण्याचे खडे निवडून भेसळीसाठी त्याचा उपयोग करीत असल्याचे रंगवले.

मधुकर टिल्लू यांच्याशी बोलताना त्यांनी एकपात्री प्रयोगासाठी घेतलेले अथक श्रम जाणवतात. त्यांना मिळालेली पारितोषिके, गौरव, पुरस्कार यांची संख्या खूप आहे. 'प्रसंग लहान विनोद महान,' 'हसायदान', 'जिंदादिल' ही त्यांच्या कार्यक्रमाची शीर्षके या सर्वांचे मिळून हजारो प्रयोग झाले आहेत.

श्री. मधुकर टिल्लू यांची मुलाखत ऐकण्यात और मजा आहे. त्यांची मुलाखत घेणे म्हणजे तास-दीड तास श्रवणभक्ती करत राहणे होय. त्यांना शुभेच्छा देऊन मी निरोप घेतला.

***



# हसण्याआधी क्षणभर

**डॉ. निशिकांत श्रोत्री**

वैद्यकीय जीवन हे खरोखरीच समृद्ध जीवन आहे. ही समृद्धी केवळ धनदौलतीची नाही. ते ज्याचे त्याला त्याच्या नशिबानुसार मिळत असते. तथापि या जीवनात मिळणारे विविध अनुभव, भेटणारी विविध प्रकारची माणसे, त्यांचे विविध स्वभाव आणि मुख्य म्हणजे त्यांच्याही जीवनाच्या अंतरंगाशी जवळून होणारी ओळख हे सगळेच समृद्ध आहे.

त्यात इथे इतरांच्या जीवनाशी साधला जाणारा दुवा हा श्रद्धेपोटी असतो. इथे ना कोणावर बळजबरी असते ना दुसऱ्याचे दडपण. केवळ रुग्णच नव्हे तर समाजात विविध स्तरांवर भेटणाऱ्या व्यक्ती आपले खाजगी अंतरंग देखील आपल्या डॉक्टरांजवळ किती विश्वासाने उघडे करून दाखवितात हे मी स्वत: तर अनुभवले आहेच, पण माझ्या इतर वैद्यकीय सहकाऱ्यांच्या आणि स्नेह्यांच्या बाबतीतही पाहिले आहे.

अर्थात येणारा अनुभव किंवा घडणारा प्रसंग हा त्या क्षणी तरी एकाच पैलूने जाणवत असला, तरी त्याचे अनेकविध पैलू असतात. अगदी त्याच व्यक्तींना नंतर मागे वळून पाहताना त्या प्रसंगाचे वेगळे भावनिक रूप दिसते. त्याचे वेगळे व्यावहारिक मूल्य लक्षात येते.

वैद्यकीय जीवन जगत असताना असे कित्येक प्रसंग आले की त्यांना तोंड देताना अक्षरश: तोंडाला फेस येण्याची वेळ आली होती; प्रसंगी हसूही आले होते. पण नंतर मात्र मागे वळून पाहताना मन अंतर्मुख झाले. मनात करुणा दाटून आली. मला जीवनाचे, व्यवसायाचे केवढे महत्त्वाचे थोर तत्त्वज्ञान अनेक प्रसंगांतून अनुभवायला मिळाले अन् त्याच बरोबर एक धडा शिकायला मिळाला.



एखादा प्रसंग इतरांना जेव्हा विनोदी वाटत असतो, त्यावेळी प्रत्यक्ष त्या प्रसंगांतून जाणाऱ्या व्यक्तींची काय अवस्था असते?

दयनीय...?

विचित्र...?

शरमिंदी...?

खरं तर कशीही असू शकेल. कधी कधी दर त्यातल्या एखाद्या व्यक्तीला आपल्या भावना प्रकटपणे मांडणे शक्यही होत नसेल.

मला आठवतंय, मनोरुग्णालयातील एक स्त्री मानसिक रुग्ण माझ्याकडे उपचारासाठी आणली गेली होती. तिच्या रोगाच्या चिकित्सेसाठी तिच्यावर छोटीशी शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. त्यासाठी तिला शस्त्रक्रियेच्या टेबलावर झोपविले.

इथपर्यंत सगळे कसे सुरळीत झाले. समस्या सुरू झाली त्यानंतरच !

भूल देण्यासाठी म्हणून तिला शिरेतून इंजेक्शन देणे आवश्यक होते. पण ते कसे

देणार?

हे मानसिक रुग्ण किती ताकदवान असतात ते त्या दिवशी समजले.

तिचा हात पाच-सहा लोकांनी धरला तरी त्यांना झुगारून देऊन अंगावरील चादर भिरकावून माझ्या डोक्यावर हात ठेवून ती उठून उभी राहायची.

दृश्य इतके चमत्कारिक होते.

ऑपरेशन टेबलाच्या खालच्या बाजूला हातात ग्लोव्हज घालून आणि शस्त्रक्रियेची उपकरणे हातात घेऊन मी बसलेला आणि माझ्या बाजूला ही वेडी बाई माझ्या डोक्यावर हात ठेवून दिगंबरावस्थेत उभी.

ऑपरेशन थिएटरमध्ये हास्याचा स्फोट झाला.

तिला पुन्हा समजावून झोपविण्यात आले. त्यासाठी मात्र तिचे सहकार्य विलक्षण होते. पण इंजेक्शनसाठी प्रयत्न केला की ती सर्वांना



झुगारून माझ्या डोक्यावर हात ठेवून उभी राहायची.

अखेरीस इंजेक्शन ऐवजी वासाने तिला भूल द्यावी अशा निर्णयाप्रत ॲनेस्थेटिस्ट आले.

पण ते तरी सोपे होते का?

वासासाठी तिच्या तोंडावर मास्क धरला अन् तिला गुदमरायला झाले. मग मात्र ती इतकी बेभान झाली की सर्वांना झुगारून देऊन तशा विचित्र अवस्थेत ती जी धावत निघाली ती थेट बाहेर!

प्रसंग वाचताना, सांगताना, ऐकताना किंवा कल्पनेने डोळ्यासमोर आणताना थोडे हसू आले.

पण त्या रुग्णाची त्यावेळी काय अवस्था असेल असा विचार माझ्या मनात आला. वयाची चाळीशी आली तरी स्वतंत्र विचार करू शकेल किंवा स्वतंत्रपणे जगू शकेल अशी बुद्धीची वाढ जिची झालीच नाही. तिच्या आजारपणात तिच्यावर उपचार करणे किती अवघड आहे. तिला स्वत:चे बरे-वाईट याचा विवेक करण्याची बुद्धी नाही. तिला जाणवतात ते फक्त स्वत:च्या देहाला होणारे क्लेश. किती अगतिक अवस्था ही!

कदाचित अशाच काही प्रसंगांच्या अनुभवानंतर माझी स्वत:ची अशा प्रसंगांकडे पाहाण्याची धारणा बदलली गेली असावी. विशेषत: रुग्णांच्या बाबतीत काही विनोदी किंवा हास्यास्पद घटना घडली की क्षणभर जरी हसू येत असले तरी लगेच माझे मन रुग्णाशी एकरूप होऊ पाहते. तिच्या भावना जाणून घ्यायचा प्रयत्न करते; अन् मग प्रत्येक वेळेस

हसू शिल्लक राहतेच असे नाही.

मला वाटतं यामुळेच माझे आजवरचे बहुतांशी लिखाण गांभीर्याकडे अधिक झुकलेले असावे.

अखेरीस विनोद म्हणजे काय?

एखाद्या अनपेक्षित प्रसंगांत जेव्हा आपले स्वत:चे व्यक्तिश: काहीही नुकसान होत नाही त्यावेळी आपण त्याकडे विनोदी दृष्टीने पाहू शकतो. रस्त्यावरून पाय घसरून एखादा पडला की त्याची फजिती झाली म्हणून आपल्याला हसू येते; पण त्यावेळी त्या व्यक्तीला भयंकर इजा झाली किंवा पडताना ती व्यक्ती नेमकी भरधाव येणाऱ्या वाहनासमोर पडून प्राणाला मुकली तर होईल का तो प्रसंग विनोदी?

हा विचार आपण फक्त शारीरिक आघातावर केला. पण जेव्हा जेव्हा म्हणून



एखादा विनोदी प्रसंग घडत असतो. त्यावेळी ज्या व्यक्ती त्यात गोवल्या गेल्या आहेत त्यांच्या मनाचा कधी विचार करतो आपण?

आजवर वैद्यकीय व्यवसायात अनेक गंमतीचे प्रसंग आले; विनोदी प्रसंग घडले. पण इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर अशा प्रसंगांकडे रुग्णाच्या आणि त्यांच्या नातेवाईकांच्या भूमिकेतून पाहाणे आवश्यक आहे हे मला जाणवले.

साहजिकच माझा त्याकडे पाहायचा दृष्टिकोन बदलला असे वाटते. दुसऱ्यांच्या दु:खांवर, वेदनांवर किंवा क्लेशांवर हसण्याचा आपला काय अधिकार?

***







# आजच्या शिळ्या बातम्या

रात्रीचे साडेदीड वाजले आहेत. आमचा बातमीदार म्याँव-म्याँव कुत्रा आपल्याला कालच्या शिळ्या बातम्या ताज्या करून सांगत आहे. आमच्या संपादिका भोनो मांजरे नुकत्याच स्वयंपाकघर नावाच्या राज्यास भेट देऊन आल्या. तेथे जोराचा भूकंप झाला आहे. त्यामुळे या राज्यास भीषण स्वरूप प्राप्त झाले आहे. तेथील भिंतीत बसवलेल्या फळ्यांवरील डब्यांना याची प्रथम जाणीव झाली. तीन डबे खाली पडले असून त्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे. एका डब्याचे मस्तक (झाकण) दुसरीकडे उडून पडले आहे. त्याच्या मृत आत्म्यास शांती मिळावी म्हणून प्रार्थना करण्यासाठी तेथे अनेक मुंग्या जमल्या आहेत. तरी खरी गोष्ट अशी आहे की त्या परत जाताना लाडूचा कण तोडून नेतात. त्यामुळे सरकारी संपत्ती असलेले हे ७ लाडू एका दिवसात जवळजवळ नाहीसे झाले आहेत. राष्ट्रपती कांदेरावांची हत्या झाली असून त्याचा आरोप श्रीमती विळीबाईंवर आहे. टोमॅटो, मटार, बटाटे, वांगे असे अनेकजण जखमी आहेत. पुरीबाईंनी गरम गरम तेलाच्या कढईत उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पण झारेरावांनी त्यांना वाचवले. टोमॅटोंच्या रसामुळे निम्मे राज्य लाल रंगाने न्हाऊन निघाले आहे. राष्ट्रपती कांदेरावांची हत्या झाल्यामुळे कित्येक भांड्यांच्या डोळ्यांतून गंगाजमुना वाहत आहेत. आत्ताच आलेल्या ताज्या वृत्तानुसार १८ वाटाणे, ८ टोमॅटो, ५ बटाटे, २ वांगी आणि एका कोबीला प्राणास मुकावे लागले आहे. केरसुणी व झाडू समितीचे बचावकार्य चालू आहे. बातमीपत्र समाप्त.

**चि. पराग कान्हेरे, ७ वी**



# साहित्य प्रेमी कवयित्री शांता ज. शेळके

**प्रा. शैलजा देशमुख**



गणेशोत्सवाचा धूमधडाका चालू असतो. ध्वनिवर्धकावरून–

***''गजानना श्रीगणराया***
***आधी वंदू तुज मोरया।''***
*किंवा*
***''गणराज रंगी नाचतो नाचतो***
***पायी घागऱ्या करिती रुणुझुणू***
***नाद स्वर्गी पोचतो।''***

यासारखी सुरेल गीते कानावर पडत असतात. गाणी आपल्या सर्वांच्याच खूप परिचयाची असतात.

लहानपणी कधीतरी –

***''खोडी माझी काढाल तर***
***अशी देईन फाईट,***
***घटकेमध्ये विरून जाईल***
***सारी तुमची ऐट!''***

सारखी बालगीतं आपण सगळ्यांनीच बोबड्या बोलांनी म्हटलेली असतात. शाळेच्या गॅदरिंगमध्ये *'मी डोलकर, डोलकर, डोलकर दर्याचा राजा'* या कोळीगीतावर नृत्य केलेले असते. *'तोच चंद्रमा नभात'* सारखे भावगीत आपल्या आई–बाबांचे आवडते गाणे असते.

इतके वेगवेगळे भावविभ्रम सुरेख शब्दरचनेत पकडणाऱ्या कवयित्री, गीतकार 'शांता शेळके' हे मराठी साहित्यातले एक बहुपरिचित नाव. आळंदी येथे पुढील महिन्यात भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा म्हणून त्यांची निवड झाली आहे. केवळ काव्यच नव्हे तर अनेक साहित्यप्रकारात त्यांनी लक्षणीय लेखन केले आहे. कथा, कादंबरी, व्यक्तिचित्रे, ललितलेख, विविध साहित्यबंध त्यांनी यशस्वीरित्या हाताळले आहेत. 'छात्रप्रबोधन'च्या दिवाळी विशेषांकात आपण त्यांच्या 'चौघीजणी' या पुस्तकाच्या रसाळ अनुवादाचा परिचय करून घेतला आहे. संस्कृत 'मेघदूत'चा अनुवाद जपानी हायकूंचा अनुवाद, अनेक इंग्रजी चित्रपटकथांचे मराठी रूपांतर शांताबाईंच्या लेखनातील वैविध्य दर्शवते.

छोट्यांसाठी गाणी लिहिताना बालगोपाळांचे भावविश्व त्या शब्दात उभे करतात. आपल्या बालनायकाची अभ्यासाची नावड, खेळाची ओढ, मुलांची स्वप्न रंगवताना मुलांचे आवडते खेळ तिथे भेटतात. त्यांच्या कवितेतला छोट्या सवंगड्यांना बेडूकउडी मारायला, लंगडी खेळायला बोलावतो.

*"मारू बेडुकउडी गड्यांनो घालू या लंगडी*
*लपाछपी खेळता देउ या झाडामागे दडी !*
*सुटी लागली, सरली शाळा*
*कोण पहाटे उठतो खुळा?*
*'अभ्यासाला बसा !' कुणी ना ओरडते*
*घडीघडी !"*

आई आपल्यासाठी गाते तसेच अंगाई गीत कुणी एक छोटुली आपल्या बाहुलीसाठी गाते–

*"कर आता गाई गाई*
*तुला गाते मी अंगाई*
*आज माझ्या बाहुलीची*
*झोप कुणी नेली बाई?"*

पाऊस आल्यावर झालेला आनंद शब्दांत मावेनासा होतो आणि

*"पाऊस आला, वारा आला*
*थेंब टपोरे गोरे गोरे*
*भर भर गारा वेचू !"*

अशा शब्दांत व्यक्त होतो. मुलांच्या स्वप्नांतल्या गावात पक्षी किलबिल करतात; झरे झुळझुळ वाहतात; गावात सर्व मुलेच राहतात. सगळे गातात, हसतात, नाचतात, झाडावर चेंडू लटकतात, शेतामधून बॅटी उगवतात.

*"नाही पुस्तक, नाही शाळा*
*हवे तेवढे खुशाल खेळा.*
*उडो बागडो, पडो धडपडो,*
*लागत कोणा नाही*
*स्वप्नी आले काही*
*एक मी गाव पाहिला बाई !"*

असा हा रम्य गाव कुणाला बरं आवडणार नाही?

मुलांच्या भावना मूल होऊन शब्दांत पकडणाऱ्या शांताबाई लावणी, विरहगीत, कोळीगीत, भावगीत असे वेगवेगळे काव्यप्रकार सहजसुंदर कुशलतेने हाताळतात. रविकिरण मंडळाचा असलेला प्रभाव त्यांच्या सुरुवातीच्या काही कवितांतून दिसतो. परंतु हळूहळू त्यातून मुक्त झालेले त्यांचे सहजसुंदर काव्य स्वत:च्या खास रूपात प्रकट होते. अतिशय समृद्ध, प्रांजळ, साधे, सरळ, सहज व्यक्तिमत्त्व हा शांताबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष त्यांच्याशी बोलताना जाणवतो तसाच तो काव्यातही व्यक्त होतो.

*"सहज फुलू द्यावे फूल, सहज दरवळावा वास*
*अधिक काही मिळवण्याचा करू नये अट्टाहास*
*सुवास–पाकळ्या, पराग देठ–फूल इतकीच देत ग्वाही*
*अलग–अलग करू जाता हाती काहीच उरत नाही."*

सांजवेळ, दाटून येणारा काळोख, त्या काळोखात जाणवणारे एकाकीपण, अनामिकाची जीवाला लागलेली ओढ त्यांच्या कवितेत अनेकदा व्यक्त होताना दिसते.

*"दृश्याच्या अवघ्या खुणा पुसटल्या काळोख येता पुढे*
*संज्ञातीत अपार काय पसरे? जाणीव कोठे बुडे?*
*सांजेचा घनदाट प्रत्यय असा येतो अकस्मात की*
*जीवाला नकळे तमातुन कुठे ही जातसे पालखी?"*

अशाच एखाद्या बुडणाऱ्या संध्याकाळी घराकडे परतणाऱ्या पाखरांच्या रांगा क्षितिजावर अगम्य संदेश लिहितात; सायंकालीन वारे कुजबुजतात. तो निरोप कवयित्रीच्या मनापर्यंत पोहोचतो. आसमंतातले शब्दहीन संवाद ते कवीमन वाचू लागते.

त्यांच्या अनेक गीतांतून स्वप्नातला गाव भेटीला येतो. कधी एखादी खुळी पोर 'मनातला रावा' तेथे शोधते; एखादी मनस्विनी त्या

गावाची वाट रानफुलाला विचारत जाते.

हळव्या भावभावनांबरोबरच देशप्रेम, माणुसकी, प्रेम या चिरंतन शाश्वत भावनांची त्यांच्या मनाला असलेली ओढही कवितेत व्यक्त होते. रणांगणी जाणाऱ्या राजसाला निरोप देताना त्याची प्रिया म्हणते.

*''या देशाची पवित्र माती*
*इथे वीरवर जन्मा येती*
*तोच वारसा तुम्ही पोहचवा येणाऱ्या शतका !''*

पंथ, जात, धर्म यापलीकडे जाऊन प्रेममय जगातील माणसांचे वर्णन करताना शांताबाई म्हणतात.

*''पंथ जात, धर्म किंवा नाते ज्या न ठावे*
*ते जाणतात अेक प्रेमास प्रेम द्यावे।''*

भिंतीवर दिसणारा डाग - त्यात कसलं आलंय काव्य ! असं कुणाला वाटेल. पण कवयित्रीच्या कल्पनाशक्तीला मात्र त्यात विविध आकार दिसतात. कधी सुंदर, निष्पाप मुलगी, तर कधी दुष्ट लांडगा ! पण वाढत्या वयाबरोबर प्रगल्भ झालेले मन त्या डागात अज्ञाताची वाट शोधू लागते.

शब्दांचं सामर्थ्य वर्णन करताना त्या म्हणतात,


*''शब्दांनीच परस्परांना भिडू बघतो आपण*
*लढू बघतो आपण*
*शब्दांना शब्द भेटतीलच असे नाही*
*शब्दांनी शब्द पेटतीलच असे नाही''*

तरीही शब्दांवरचं त्यांचं प्रेम कमी होत नाही. रसिकांपर्यंत पोहोचण्याचं शेवटी ते एक प्रभावी माध्यम आहे हे त्यांना पक्कं माहीत आहे. म्हणूनच साहित्यावर प्रेम करणं हा त्यांचा धर्म आहे. शब्द हाच श्वास आहे.

*'हे एक झाड आहे'* या सुंदर कवितेत झाडाशी असलेले जन्माचे नाते त्या किती अर्थपूर्ण शब्दात व्यक्त करतात-



*''मातीचे झाड, झाडाची मी; माझी पुन: माती*
*याच्या पानावरच्या रेषा माझ्या तळहाती.*
*ढलपी ढलपी सुटून मुळे झाली सैल*
*रुजते आहे झाड माझ्या रक्ताच्याही पैल*
*कधीतरी अेके दिवशी मीच झाड होईन*



*पानांमधून ओळखीचे जुने गाणे गाईन.''*

वर्षा, गोंदण, अनोळख, जन्मजान्हवी, झोपेचा गाव इ. कवितासंग्रहाबरोबरच *'आनंदाचे झाड', 'पावसाआधीच पाऊस', 'मदरंगी', 'एकपानी'* इ. ललितलेखसंग्रह, *'वडीलधारी माणसे'*, हा व्यक्तिचित्रांचा संग्रह असे बहुविध गद्यलेखनही शांताबाईंनी केले आहे. उत्कट साहित्यप्रेम, रसिकता, साहित्याविषयीचे सर्वस्पर्शी कुतूहल हे त्यांचे गुणविशेष त्यात व्यक्त होतात.

ललित लेखनाचे विषय कसे सुचतात याविषयी शांताबाईंनीच म्हणून ठेवले आहे. 'भोवताली घडणाऱ्या घटना, वावरणाऱ्या व्यक्ती, कानावर पडलेले एखादे वाक्य, शब्द, एवढेच काय झाडावरून पडलेले एखादे पान पाहाताना लेखाचा विषय सुचून जातो. बालपणीच्या अनेक आठवणी या लेखनात अपरिहार्यपणे येतात. वाचनातूनही अवचित काहीतरी मनात घुसते. त्यातून प्रतिक्रिया शब्दात व्यक्त होतात.' केवळ शब्दांचीच नव्हे तर सूर, रंग, रेषा, पाषाण, या विविध भाषा, त्यांचा अर्थ लेखिकेचे मन शोधते. शब्दावाचूनही माणूस बोलतो, झाडांची सळसळती पालवी, आभाळात भरून आलेला ढग, वाऱ्याची हळुवार झुळूक, भरून आलेला पाऊस या साऱ्यांची भाषा शब्दहीन पण खूप बोलकी व अर्थपूर्ण असते. एकान्त हा काही वेळा खूप हवासा तर काही वेळा नकोसा वाटणारा असतो. फुटपाथवरच्या जुन्या पुस्तकांना स्वत:चे व्यक्तिमत्त्व असते ते लेखिकेला भावते. कधीतरी पाहिलेला सुंदरसा चित्रपट, वाचलेले छानसे पुस्तक कोणत्यातरी प्रसंगी त्याचे स्मरण होते; संदर्भ जोडले जातात.

कवी, कविता, कलाकार इ. विषयींच्या लेखातून त्यांच्या अभिरूचीचे दर्शन होते. वरवर दिसणाऱ्या विषयाच्या आत दडलेला खोल अर्थ त्यांचे मन शोधत असते. पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यांकडे पाहताना त्यांना सहज वाटून जाते वारीला न जाणारेही अनेक वारकरी असतात. प्रत्येकाची पंढरी वेगळी असेल; प्रत्येकाच्या मनातला विठ्ठल वेगळा असेल; पण वारीच्या पुण्यप्रद वाटेवरून त्यांची पावले कधीतरी पडलेलीच असतात. प्रत्येकाच्या आत एक वेगळाच माणूस दडलेला असतो. आपल्या मनाला अनेक *'फसवी दारे'* असतात. *'नवी ओळख'* या लेखात आपली आपल्याला तरी पुरती ओळख पटलेली असते का? हे मार्मिक, सखोल आत्मनिरीक्षण लेखिकेला अस्वस्थ करते.

संस्कृत भाषेतून आलेले विविध शब्द, त्यांची ग्रामीण रूपे, ब्राह्मणी भाषेचे रूप अशा अनेक निरीक्षणांतून भाषेविषयीचे चिंतन त्यांच्या लेखात येते.

एकूणच पूर्वग्रहरहितता, मनाचे डोळसपण, जीवनाबद्दलचे उदंड कुतूहल, कोणत्याही लहानमोठ्या गोष्टीला चटकन प्रतिसाद देणारी संवेदनक्षम वृत्ती, आत्माविष्काराने लाभणारी तृप्ती, इतरांशी संवाद साधण्याची निकड या शांताबाईंच्या लेखनामागच्या खऱ्या प्रेरणा आहेत. मनुष्यस्वभावाचे कंगोरे न्याहाळण्याची आवड व स्वत:ला आलेले सूक्ष्मातिसूक्ष्म अनुभवही इतरांपर्यंत पोहोचविण्याची उत्सुकता त्यांना सतत लिहिण्याची प्रेरणा देते. त्यांना स्वत:लाही याची पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच

त्या म्हणतात–

*''असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे*
*फुलाफुलात येथल्या उद्या हसेल गीत हे*
*स्वये मनात जागते न सूर ताल मागते*
*अबोल राहुनी स्वत: अबोध गूढ सांगते*
*तृणात फूलपाखरू तसे वसेल गीत हे*
*फुलाफुलात येथल्या उद्या हसेल गीत हे''*

खरंच शांताबाई, तुमच्या कविमनात उत्स्फूर्तपणे उमलणारी सुंदर नवनवीन गीतं ऐकण्यासाठी रसिक उत्सुक आहेत. साहित्याविषयी उत्कट प्रेम असणारी व स्वत: मराठी साहित्यात मोलाची भर घालणारी आपल्यासारखी व्यक्ती साहित्य संमेलनाची अध्यक्ष व्हावी, याचा आनंद प्रत्येकाच्या मनात आहे. मन:पूर्वक अभिनंदन ! ***



## विनोदसम्राट पु. ल.

*निखळ खळाळून हसवणारा विनोद म्हणजे काय याचं मूर्तिमंत दर्शन घ्यायचं असेल तर महाराष्ट्राचे लाडके लेखक श्री. पु. ल. देशपांडे यांचं विनोद वाङ्मय वाचायलाच हवं. पु. लं. चं समग्र वाङ्मय हा दोन–चार पानात बंदिस्त करण्याचा विषय नाही. म्हणून ते धाडस आम्ही करत नाही. फक्त या अंकाच्या निमित्ताने एक झलक म्हणून 'कोट्याधीश पुल' या पुस्तकातील दोन किस्से येथे देत आहोत.*

* पु. ल. एकदा काश्मीरला गेले होते. तिथलं निसर्गदत्त सौंदर्य पाहण्यासाठी डोंगरदऱ्यांतून हिंडणं क्रमप्राप्तच होतं. तिथले रस्ते चढणीचे, अरूंद, उंचसखल आणि दगडधोंड्यांची रेलचेल असणारे असे होते. तिथे एक तर पायी फिरणं अथवा घोड्यावरून जाणं एवढेच काय ते आपल्यासमोरचे पर्याय! डोंगर चढणं तसं पुलंना त्रासदायकच वाटायचं. (या संदर्भात पुलंचं, ''बाबासाहेब पुरंदरे ह्यांच्याबरोबर फक्त वसईचा भुईकोट किल्लाच पायी फिरून पाहण्याचा 'तह' मी मोठ्या शिताफीने केला'' हे भाष्य आठवतं.) साहजिकच पुलंनी घोड्यावरून प्रवास करून काश्मीरची सफर पूर्ण केली. तिथल्या त्या खडकाळ, अरूंद आणि चढणीच्या रस्त्यावरून फिरणं नक्कीच सुखावह नव्हतं. मुक्कामावर पोहोचेपर्यंत हाडं खिळखिळी झाल्याचा अनुभव त्यांना आला.

हा अनुभव तसा सर्वांचाच, पण पुलंची त्यावरची प्रतिक्रिया मात्र मासलेवाईक आहे :

''इतिहासकालीन प्रसिद्ध वीरांचे अश्वारूढ पुतळे ठिकठिकाणी का उभे केले जातात, ते मला माझ्या 'घोडदौडी' नंतर लगेच कळलं. हाडं खिळखिळी न होता आयुष्यभर ज्यांनी घोडदौड केली, त्यांचे केवळ त्याच पराक्रमासाठी अश्वारूढ पुतळे उभे करीत असावेत.''

* पुण्याचे अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. संचेती यांचं हॉस्पिटल आणि तिथली उत्तम व्यवस्था पाहिल्यावर पु. ल. म्हणाले, ''याला म्हणावं, हाडाचा डॉक्टर !'' (डॉ. संचेती हे पुण्यातील प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ आहेत.)

* 'पु. ल. : एक साठवण' च्या प्रकाशन–समारंभात पु. ल. म्हणाले,

'मला एकसष्टावं वर्ष प्रथमच लागत आहे. अशा वेळी होणाऱ्या सत्काराला व गुणगौरवाला कसं उत्तर द्यायचं, याचा मला अनुभव नाही. कारण मी नववृद्ध !''

## आकड्यांशी मस्ती – १९९६ पासून १ ते १००

प्रा. महेन्द्र सेठिया

नुकतेच इसवी सनाचे नवीन वर्ष सुरू झाले. या वर्षात ४ आकडे आहेत. १, ९, ९ व ६ हे चार आकडे एकदाच वापरून व विविध चिन्हांचा वापर करून १ ते १०० संख्या तयार करायच्या आहेत. खाली प्रत्येक संख्येसाठी १ उत्तर दिले आहे. काही संख्यांच्यापुढे उत्तर लिहिलेले नाही. त्यांची उत्तरे लिहून पाठविल्यास वेगळे बक्षीस पाठवू. खरं तर प्रत्येक संख्या अनेक पद्धतीनर मिळवता येईल. तुम्ही या आकड्यांशी दोस्ती (प्रसंगी दोस्ती करूनही) त्यांच्यापासून जास्तीत जास्त प्रकारे १ ते १०० या संख्या मिळवा. तुमची उत्तरे आमच्याकडे पाठवा. जास्तीत जास्त प्रकारे जास्तीत जास्त संख्यांची उत्तरे पाठविणाऱ्यांना खास बक्षीस ! खालील उत्तरे वाचून तुम्हालाही गंमत वाटेल. काही नवीन कल्पना सुचतील. नवीन वर्षाची ही भेट तुम्हाला निश्चितच आवडेल.

$१ = \frac{\sqrt{९} + \sqrt{९}}{६}$

$२ = १ + \frac{९}{९}$

$३ = ६ - \sqrt{९}$

$४ = १९ - ९ - ६$

$५ = ९६ - ९१$

$६ = \sqrt{९} + \sqrt{९}$

$७ = \sqrt{१६} + \sqrt{९}$

$८ = ६ + १ + \frac{९}{९}$

$९ = ६ + \sqrt{९}$

$१० = १६ - ९ + \sqrt{९}$

$११ = ९ + \sqrt{९} - १$

$१२ = \sqrt{१६} \times \sqrt{९}$

$१३ = १९ - ६$

$४ = \sqrt{१९६}$

$५ = ६ \times \sqrt{९} - \sqrt{९}$

$६ = \sqrt{९९ + १} + ६$

$७ = १९ - \frac{६}{\sqrt{९}}$

$१८ = ६ + ९ + \sqrt{९}$

$१९ = ९ + ९ + १$

$२० = (९ \times ९) - ६१$

$२१ = ६ \times \sqrt{९} + \sqrt{९}$

$२२ = ९१ - ६९$

$२३ = १९ + \sqrt{१६}$

$२४ = \frac{९६}{(\sqrt{९} + १)}$

$२५ = १ + ९ + ९ + ६$

$२६ = ६ \times \sqrt{९} + ९ - १$

$२७ = \frac{(\sqrt{९})^{\sqrt{१६}}}{\sqrt{९}}$

$२८ = १९ + ६ + \sqrt{९}$

२९ = -----

$३० = (९ + ६)(\sqrt{९} - १)$

$३१ = \frac{९६}{\sqrt{९}} - १$

$३२ = ९ \times \sqrt{९} + ६ - १$

$३३ = (\sqrt{९} + १) \times ६ + ९$

$३४ = १६ + ९ + ९$

$३५ = ९ \times ६ - १९$

$३६ = ६ \times (\sqrt{९} - १) \times \sqrt{९}$

$३७ = ९१ - (६ \times ९)$

$३८ = १९ \times \frac{६}{\sqrt{९}}$

$३९ = (\sqrt{१६} \times ९) + \sqrt{९}$

४० = -----

४१ = -----

$४२ = \sqrt{१९६} \times \sqrt{९}$

$४३ = ६१ - (९ + ९)$

$४४ = (९ + ६) \times \sqrt{९} - १$

$४५ = (\sqrt{१६} + १) \times ९$

$४६ = ९ \times ६ + १ - ९$

४७ = -----

$४८ = (९ - १) \times ६$

$४९ = ६१ - ९ - \sqrt{९}$

$५० = (९ \times ६) - (\sqrt{९} + १)$

$५१ = १९ \times \sqrt{९} - ६$

$५२ = ६१ - ९$

$५३ = ९ \times ६ - १$



कल्पनाशक्ती वाढविण्यासाठी 'कल्पक बनू या' अवश्य वाचा-ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन.

५४ = (६ - १) × ९ + ९

५५ = (६१-९) + $\sqrt{९}$

५६ = (९ × ६) + $\sqrt{९}$ -१

५७ = (१६+$\sqrt{९}$) × $\sqrt{९}$

५८ = ६१ - $\sqrt{९}$

५९ = ६९ - (९+१)

६० = (९+६) × ($\sqrt{९}$+१)

६१ = $(\sqrt{१६})^{\sqrt{९}}$ - $\sqrt{९}$

६२ = ६१ + $\frac{९}{९}$

६३ = ९ × (६ + १)

६४ = (९× ६) +(९+१)

६५ = ६९ - $\sqrt{९}$ - १

६६ = (६+१)× ९ + $\sqrt{९}$

६७ = ६१ + $\sqrt{९}$ + $\sqrt{९}$

६८ = ६९ - १

६९ =(९+१)× ६ + ९

७० = ६१ + ९

७१ = ६९ + $\sqrt{९}$ -१

७२ = $\sqrt{(\sqrt{१६})^{\sqrt{९}}}$ × ९

७३ = (९+$\sqrt{९}$) × ६+१

७४ = ९ × ९ - ६ - १

७५ = १६ + ९× $\sqrt{९}$

७६ = ९१ -(९ + ६)

७७ = ९ × ९ - $\sqrt{१६}$

७८ = (९+ $\sqrt{९}$+१)× ६

७९ = ६१ + ९ + ९

८० = ९ × ९ - १

८१ = ९ × ९

८२ = ९१ - ९

८३ = ९९ - १६

८४ = (९+$\sqrt{९}$) × (६+१)

८५ = ९ × ९ + $\sqrt{१६}$

८६ = ९ × ९ + ६ - १

८७ = ९६ - ९

८८ = ($\sqrt{९}$ × ९) + ६१

८९ = ९१ - $\frac{६}{\sqrt{९}}$

९० = (९ + ९) × (६-१)

९१ = ९१

९२ = ९६ - ($\sqrt{९}$ + १)

९३ = ९९ - ६

९४ = ९६ -($\sqrt{९}$ - १)

९५ = ९९ - $\sqrt{१६}$

९६ = १६ ($\sqrt{९}$+$\sqrt{९}$)

९७ = ९६ + १

९८ = ९९ -१

९९ = ९६ + $\sqrt{९}$

१०० = ९१ + ९



## 'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

| | | |
|---|---|---|
| **निगडी** | : | ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४ ☎ ८४३८० |
| **सोलापूर** | : | ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, डफरीन चौक, सोलापूर ☎ २५७८२ |
| **सातारा** | : | श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२७/१ अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ सातारा. ☎ ५०५०४ |
| **सांगली** | : | श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गाव भाग, खाडिलकर गल्ली, सांगली. |
| **कोल्हापूर** | : | डॉ. शुभांगी कुलकर्णी आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर ☎ २१५३४ |
| **नाशिक** | : | सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रोड, नाशिक ☎ ५७४८३० |
| **मुंबई** | : | श्री. अनिल यशवंत दांडेकर, विश्वस्त : अवध्य चॅरिटिज्, ५२ ए, सह्याद्री, बजाज हॉलसमोर, ५०, स्वामी विवेकानंद रस्ता. मालाड (प.) मुंबई – ६४ ☎ ८७२५३१९ |
| **ठाणे** | : | डॉ. अजित दातार, बी–२० अहिल्या सोसा., घंटाळी रोड, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७ |
| **डोंबिवली** | : | सौ. ज्योती आवटी, ३–श्री बिल्डिंग, टिळकनगर, डोंबिवली (पूर्व) ☎ ४७४१३९ |
| **पनवेल** | : | सौ. मेधा मयुरेश सोहोनी, पी. एल. ६–१३–६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, अभ्युदय बँकेमागे, नवीन पनवेल. |
| **रत्नागिरी** | : | कु. नीता अ. श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागिरी. ☎ २२४८७ |
| **धुळे** | : | सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे |
| **चाळीसगाव** | : | श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक गुरुकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव |
| **परभणी** | : | श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी |
| **लातूर** | : | डॉ. अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४३६१४ |
| **औरंगाबाद** | : | १) कर्नल पी. एन. मोडक, प्लॉट नं. ३०६/३०७ सेक्टर नं. 'C' N -1 भक्तीनगर, गणेश मंदिराजवळ, सिडको, नवीन औरंगाबाद. ☎ ४८२६२६<br>२) सौ. स्वाती शरद पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला पैठण गेट, औरंगाबाद ३. |
| **बेळगाव** | : | अमित कुलकर्णी, ३७५ नेहरू रस्ता, टिळकवाडी, सोमवार पेठ, बेळगाव. |




**हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून सौर माघ १ शके १९१७ २१ जानेवारी १९९६ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस येथे छापून ज्ञान प्रबोधिनी पुणे येथून प्रसिद्ध केले.**

**छात्र प्रबोधन** ..निव्वळ मासिक नव्हे !.. कृतिशील उपक्रमांचा स्रोत !!

### एप्रिल - मे - जून १९९६ मधील विविध शिबिरे

## नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे

इ. ८ वी ते १२ वी च्या सभासदांसाठी ६ दिवसांचे निवासी शिबिर

**या शिबिरात नियोजन कौशल्य, संपर्क कौशल्य, निर्णय कौशल्य, गटबांधणी कौशल्य इ. नेतृत्व कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल तसेच विविध गटकार्ये, खेळ, कथाकथन, पद्यगायन, गटचर्चा इ. विविधांगी कार्यक्रम असतील.**

या शिबिरात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्रात ठिकठिकाणी व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे घेण्यासाठी पाठवणार !

**शिबिराचे शुल्क :** रु. २५०/- (शिबिर काळातील निवास-भोजन इ.)

(मुलामुलींची स्वतंत्र शिबिरे पुण्यामध्ये होतील)

**स्वतःमधील नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी या शिबिरात आवर्जून सहभागी व्हा !**

## व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे

इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी

७ दिवसांची व्यक्तिमत्वाच्या विविध अंगांना स्पर्श करणारी शिबिरे !

**देशीविदेशी खेळ खेळणे, विविध प्रकारची हस्तकौशल्ये शिकणे, महत्त्वाच्या स्थळांना भेटी देणे, विविध शास्त्रीय प्रयोग करणे, या व्यतिरिक्त विविध स्पर्धा, गंमतजत्रा, कथाकथन, स्फुर्तिगीतांचे गायन, मुलाखती, इ. अनेक कार्यक्रम**

**शुल्क :** रु. ५०/- (सभासदांसाठी रु. ४५/-)

**शिबिरांची ठिकाणे**

| मुलांसाठी (१० ठिकाणी) | मुलींसाठी (७ ठिकाणी) |
|---|---|
| सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, लातूर, परभणी, धुळे, नाशिक, ठाणे, औरंगाबाद | सातारा, सांगली, नाशिक, धुळे, ठाणे, लातूर, पुणे. |

वरील दोन्ही शिबिरे १५ एप्रिल ९६ ते १० जून ९६ या कालावधीत होणार आहेत. निवडणुकांच्या व परीक्षांच्या तारखा निश्चित झाल्यावर शिबिरांच्या तारखा निश्चित होतील व त्या पुढील अंकात कळवल्या जातील.

**स्थानिक कार्यालयांमध्ये शुल्क भरून शिबिरांची नावनोंदणी करा.**

**सुट्टी अधिक अनुभवसंपन्न करण्याची संधी दवडू नका.**

# नवीन पर्व के लिये.....

नवीन पर्व के लिये नवीन प्राण चाहिये ॥ धृ ॥

स्वतंत्र देश हो गया प्रभुत्वमय दिशा मही ।
निशा कराल टल चली स्वतंत्र माँ विभामयी ।
मुक्त मातृभूमि को नवीन मान चाहिये ॥ १ ॥

चढ रहा निकेत है कि स्वर्ग छू गया सरल ।
दिशा दिशा पुकारती कि साधना करो सफल ।
मुक्त गीत हो रहा नवीन राग चाहिये ॥ २ ॥

ध्यान में सदा रखो की कंटकों की राह है ।
प्राणदान का समय उमंग है उछाह है ।
पगों में आँधियाँ भरे प्रयाण गान चाहिये ॥ ३ ॥


**संपर्क पत्ता :**

संपादक, छात्र प्रबोधन

ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,

पुणे ४११ ०३० ☎ ४७७६९१

**कार्यालयाची वेळ :** स. १० ते संध्या. ७

**या अंकाची किंमत :** रुपये ६/-

**वार्षिक वर्गणी :** रुपये ७५/-

**प्रकाशन दिनांक :** १ माघ, शके १९१७
२१ जानेवारी १९९६